श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



नाकुर्डीज बाबांच्या दृष्टीला लागलेली आग विझविताना
बाबा धुनीत पाणी शिंपडीत आहेत.

लोहाराची लहानगी भट्टीत पडली तेव्हा तिला वाचविताना साईबाबा


**श्री साईनाथ वाचनालय**

**श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.**

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


**श्रीसाई वाक्सुधा**


वर्ष ६१ वे )    किंमत १ रुपया    ( अंक ६

सप्टेंबर १९८२



: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३३६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

मुखीं श्रीसाईनामावर्तन ।
चित्तीं तयाचें वचनचिंतन ।
मनीं तयाचे मूर्तीचें ध्यान ।
पूर्ण समाधान येणें मज ॥ २३ ॥

वदनी श्रीसाईचें नाम ।
अंतरी श्रीसाईचें प्रेम ।
ज्याचें साईप्रीत्यर्थ कर्म ।
ऋणाईत परम त्या साई ॥ २४ ॥

तुटावया संसार बंधन ।
याहुनि नाहीं अन्य साधन ।
साई कथा परम पावन ।
सदा सेवन सुखदायी ॥ २५ ॥

पायीं साईसी प्रदक्षिण ।
करा श्रवणीं सच्चरित् श्रवण ।
सर्वांगी द्या प्रेमालिंगन ।
डोळां घ्या दर्शन साईचें ॥ २६ ॥

साष्टांगीं यावें लोटांगणीं ।
मस्तक ठेवावें तया चरणीं ।
जिव्हा लावावी तन्नामस्मरणीं ।
नासिकें अवघ्राणीं निर्माल्य ॥ २७ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४९ वा.



सुरेशः शरणं शर्म
विश्वरेताः प्रजाभवः ।
अहः संवत्सरो व्यालः
प्रत्ययः सर्व दर्शनः ॥
अजः सर्वेश्वरः सिद्धः
सिद्धिः सर्वादिरच्युतः ।

—श्री विष्णू सहस्त्रनाम—श्लोक २३-२४

सुरेशः सुर म्हणजे देव. प्रकाशाचे प्रतिनिधि जिथे जिथे प्रकाश आहे तिथे सुरतत्व आहे काजव्यात प्रकाश आहे. तारकेत प्रकाश आहे. चंद्रात प्रकाश आहे आणि सूर्यातही प्रकाश आहे. प्रकाशकत्वामुळे हे सारेच देव आहेत. परंतु हे सर्व देव अंशभूत आहेत. अंशी परमात्मा आहे. त्याच्याच प्रकाशाने हे सर्व प्रकाशत आहेत. त्यामुळे परमात्मा हा सर्व सुरांचा ईश म्हटला पाहिजे.

# अनुक्रमणिका सप्टेंबर १९८२ २८


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | – |
| २) | श्रीसाई गायत्री एक दर्शन | – सौ. प्रेमला शं. मैराळ |
| ३) | श्री म्हाळसापती भगत | – साईनंद |
| ४) | जीवनाची नौका हाकणारा नावाडी भगवान साई | – कु. वत्सला मु. आजगावकर |
| ५) | सद्गुरु कृपा | – श्री. स. व्यं. कुलकर्णी |
| ६) | श्रीसाईबाबा व ज्योतिषशास्त्र | – ले. क. मु. ब. निंबाळकर |
| ७) | श्रीसाई–एक श्रद्धास्थान | – श्री. मुरलीधर घोलप |
| ८) | महानिर्वाणानंतरचे साईबाबा | – श्री. पां. वा. भुतकर |
| ९) | धन्य झाले साईदर्शन | – श्री. द. बं. बर्दापूरकर |
| १०) | श्रीसाईबाबांचा धर्म | – श्री. विजय हजारे |
| ११) | उपासनी व श्रीसाईबाबा | – श्री. नानासाहेब जोशी |
| १२) | भक्तपदवी व शिष्यपदवी | – श्री. चकोर आजगावकर |
| १३) | इच्छापूर्ती | – डॉ. इंदूताई नाईक |
| १४) | आशीर्वाद सद्गुरु साईंचा प्रवास होई सुखाचा | – श्री. रमेश कृष्णराव गिरडकर |
| १५) | नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य नित्य घ्या प्रचित अनुभवे | – श्री. द. बा. वाडकर |
| १६) | बाबांचे निरंतर छत्र | – सौ. शालिनी शा. दळवी |
| १७) | श्रीसाईसच्चरित्रातील बोध | – श्री. माधवराव गोरे |
| १८) | श्री प्रभुसाईनाथा | – श्री. चंद्रकांत गरगटे |
| १९) | शिरडीमें साईनाथ बडे संत हो गये | – श्री. गुलाबराव देशमुख |
| २०) | साई–अष्टक | – श्री. प्र. गो. कुलकर्णी |
| २१) | मेरी बिनती सुनो ओ बाबा | – कु. कल्पना वापीवाला |
| २२) | ॐ साई | – डॉ इंदू नाईक |
| २३) | मागणे | – श्री. डी. बी. पोतनीस |
| २४) | काय मागावे ? | – प्रा. गुंडेराव पटवारी |
| २५) | ग्रंथपरिक्षण | – – |
| २६) | भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे | – – |
| २७) | शिरडी वृत्त | – – |

# श्रीसाईबाबांची भक्ति

**मात्र माझे करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण**
**ठेवा, करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ॥**

—श्री साईसच्चरित




श्रीसाईबाबा समाधिस्थ होऊन ६४ वर्षांचा काळ मागे पडलेला आहे. आणि एवढ्या या दीर्घकाळानंतरही त्यांचे पुण्यस्मरण, भक्ति, भजन जनतेला तारक, पोषक व कल्याणप्रद होऊन राहिले आहे. आपल्या हयातीत आपले निस्सिम भक्त सुखी व्हावेत, त्यांची मनकामना पूर्ण व्हावी व त्यांच्याकडून सत्कार्ये घडावी यासाठी ते झटत असत. आज प्रत्यक्ष देहाने ते आमच्यात वावरत नसले, तरीही त्यांचे ते कार्य अखंडित चालू आहे. जनमनावर त्यांचा जो पगडा बसलेला आहे तो उगाच नाही. बाबा हे जागते दैवत आहेत. जो जो त्यांची आठवण करील, जो जो त्यांची अंतःकरणापासून भक्ति करील, जो जो त्यांच्याठायी निस्सिम श्रद्धा भाव ठेऊन वागेल, त्याचे कोटकल्याण झाल्याशिवाय रहाणार नाही. पाहिजे अखंड स्मरण, श्रद्धा व भक्ति.

आजकाल आम्ही देवाची किंवा बाबांची आठवण करतो ती संकटसमयी अंतःकरणात भक्तीचा ओलावा जागा होऊन शिरडीला धाव घ्यावीशी वाटते ती अडीअडचणीच्यावेळी, तरीही बाबा तुमच्या भक्तिभावाचे फळ तुमच्या पदरात टाकल्याशिवाय रहात नाहीत.

आम्ही सारेजण तात्पुरत्या सुखाकडे व फायद्याकडे पहाणारे आहोत. आमच्या भजन पूजनात व पाठांतरात काही ना काही हेतु हा असतोच. निष्काम भजन पूजन करणारे फार थोडे, आणि ज्यांच्या वाट्यास निष्कामवृत्तीचे भाग्य आले ते धन्य होत.

सकाम भक्ती करता करता तरी आम्ही पायरी पायरीने निष्काम भक्तिकडे वळले पाहिजे. भक्तिभावात सातत्य, अखंडितपणा संभाळला पाहिजे. हा अखंडितपणा सांभाळणे म्हणजे काय ! श्रीसाईबाबांची भक्ती करायची व ती सतत चालू ठेवायची म्हणजे काय ? आमच्या देहात अनेक दुर्गुणांनी कायमचे घर केले आहे. आमचा

स्वार्थ तेवढा आम्हाला दिसतो. तो दिसावा, परंतु त्याच बरोबर इतरेजनांच्या सुखाचा आम्हाला विसर न पडावा-आपल्याकडून दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी जे जे करता येण्यासारखे असेल ते ते करण्याकडे आमचे लक्ष स्वयंस्फूर्तीने वळले पाहिजे. मी माझे कल्याण साधीन, परंतु त्याच बरोबर इतरेजनांच्या कल्याणासाठी शक्य त्या परीने झटेन, ही भावना मनात सदैव जागृत राहिली पाहिजे.

आमची दृष्टि आज अत्यंत संकुचित आहे, ती दूरवर फाकली पाहिजे. आमचे कल्याण तेवढे आम्हाला दिसते. त्याचबरोबर इतरांचेही दिसले पाहिजे! बाबांकडे लक्ष लावायचे म्हणजे बाबांचे जसे दीन दुबळ्यांकडे व दुःखीतांकडे नेहमी लक्ष लागून राहिलेले असे तोच कित्ता आम्ही गिरविला पाहिजे. म्हणजे आमच्यात माणुसकी आली पाहिजे. रोज दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचे कितीतरी मोके येतात. मनात आणले तर दुसऱ्यांसाठी आम्ही काही ना काही करू शकतो; परंतु दुर्दैवाने तशी बुद्धीच होत नाही आपल्याला!

तोच बाबांचा आवडता भक्त होऊ शकेल व त्याच्यावरच बाबांची कृपादृष्टि वळू शकेल की जो परदुःख शीतळ न मानता ते दुःख दूर करण्यासाठी झटेल व त्यासाठी पुढे सरसावेल.

बाबा नवसास पावावे म्हणून आपण नवससायास करतो; परंतु भलत्यासलत्याच्या नवसास बाबा कसे पावतील! जशी श्रद्धा तसे फळ तूच माझे सर्वस्व. तुझ्याशिवाय माझा त्राता दुसरा कोणी नाही, अशा तळमळीने, अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना त्यांना पोहोचते.

आम्ही शिरडीची यात्रा करतो. केलेले नवस फेडतो; श्रीसाईसच्चरिताची पारायणे करतो; गोड गोड नैवेद्य दाखवितो. हे अशाप्रकारचे सारे बाह्योपचार आपण करतो परंतु त्यात आपले अंतःकरण असते का! बाबांना तुमचे डामडौल व दिखाऊपणा नको. बाबांना तुमचे अंतःकरण पाहिजे. बाबांना तुमचे सदाचरण पाहिजे. बाबांना तुमची सच्छीलता पाहिजे.

बाबांची सेवा म्हणजे मानवसेवा. बाबांची खरीखुरी भक्ती म्हणजे माणुसकीचे आचरण. आपल्या कृपेचा प्रसाद कोणाला मिळतो! कोणत्या गोष्टींवर आपण निहायत खूष आहोत व कोणत्या गोष्टी केल्या असता आपण प्रसन्न होतो हे बाबांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

**आल्यागेल्याचा आदर करी । तृषितां जल भुकेल्या भाकरी ।**
**उघड्यास वस्त्र बसाया ओसरी । देतां श्रीहरी तुष्टेल ॥**

या माणसाच्या मामुली व सर्वसाधारण गरजा झाल्या. आज जगात जे तांडव चालू आहे, ज्या चढाओढी, हालचाली व उपद्व्याप चालू आहेत, ते कशासाठी? पोटभर अन्न मिळावे, अंगभर वस्त्र मिळावे व रहायला आसरा मिळावा, यासाठी या जीवाच्या साऱ्या आटापिटी! सारे राजकारण या तीन गोष्टीत सामावलेले आहे. यासाठी युद्धे, तंटे, भांडणे, कापाकापी, वितंडवाद चालू आहेत.

सूक्ष्म दृष्टीने पाहिले असता वादविवाद व झगडे होतात ते या तिन्ही गोष्टीसाठी किंवा त्यापैकी एखाद्या गोष्टीसाठी. आज जगात सुखी कोण! ज्याच्याजवळ भरपूर अन्नवस्त्र व जागा आहे. या जगात बहुसंख्य लोकांपाशी यापैकी एक आहे तर दुसरे नाही किंवा तिन्हीही नाहीत; आणि म्हणून ती दुःखी कष्टी!

समाजातील हा दुःखीकष्टीपणा जावा यासाठी हस्ते, परहस्ते झटणे, जरूर त्या साधनाच्या अभावी होणारे कष्ट आपल्या हातून होतील तेवढे कमी करणे व आपल्य शक्तीप्रमाणे जे जे आपल्या सान्नीध्यात येतील त्यांच्या सुखासाठी व आनंदासाठी झटणे, हीच बाबांची खरीखुरी पूजा व सेवा होय.

तुम्ही बाबांच्या चरणी काय काय वाहिले, यापेक्षा तुम्ही दुःखितांचे दुःख कमी करण्यासाठी, त्यांच्या जीवनात आनंदाचा ओलावा आणण्यासाठी व त्यांचे दैन्य निवारण करण्यासाठी किती झटला, याकडे बाबांचे लक्ष बारकाईने असते. दुसऱ्यांचे दुःख दैन्य दूर करण्यासाठी झटणे हा मानवधर्म आहे. परंतु नेमके त्याच धर्माला आम्ही पारखे झालेले आहोत. श्री साईबाबा काय किंवा आजवर होऊन गेलेले थोर संत महात्मे काय, याच मानव धर्मावर अर्थात् माणुसकीवर सर्व जोर देत आलेले आहेत, आणि या मानवतेची, माणुसकीची पूजा–तिचे अहर्निश आचरण म्हणजेच श्रीसाईबाबांचे भजन–पूजन.

अशा रीतीने जे श्रीसाईबाबांचे पूजन अर्चन करतील त्यांचे कोडकौतुक पुरल्याशिवाय, व त्यांचे कोटकल्याण केल्याशिवाय, ते केव्हाही रहाणार नाहीत. तेच तर त्यांचे ब्रीद आहे व त्यासाठीच त्यांचा अवतार आहे.

**जो मजलागी अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मत्भजन ।**
**माझे चिंतन, माझे स्मरण । तयाचे उद्धरण ब्रीद माझे ॥**

卐

# श्री साई गायत्री एकदर्शन 277

—सौ. प्रेमला शंकरराव मैराळ
'हेरंब', गणेशबाग, मैराळवाडी
बडोदे ३९००१७

● परमपूज्य श्री शांतवनजी हे गुजरातमधील महान संत आहेत. ते महान गायत्री उपासक आहेत. हिमालयात व गंगातीरी ध्यानधारणेसाठी पुष्कळ दिवस राहिल्यानंतर आता येथे करनाळीस स्थायिक झाले आहेत. करनाळी हे ठिकाण बडोदे जिल्ह्यात नर्मदा काठी आहे. ( चांदोदजवळ ) श्री. शांतवनजी महाराज ब्रह्मचारी आहेत. मागील तीस वर्षापासून ते भगवती गायत्रीची उपासना करीत आहेत. चैत्रात व आश्विन महिन्यात नऊ दिवस अनुष्ठाने तसेच इतर भक्तांना मार्गदर्शन करणे वगैरे त्यांचे कार्यक्रम करनाळीस चालू असतात. ह्या प्रसंगी गुजरात तसेच इतर भागातून जे भक्त तेथे एकत्र जमतात त्यांचेसाठी चहापाणी व जेवण वगैरेची व्यवस्था फुकट केली जाते. 'श्री साईबाबांनी' त्यांना फकीर वेषात येऊन वाचविले आहे व नंतर दर्शन दिले आहे. त्या विषयीची हकिगत त्यांच्याच शब्दात खाली दिली आहे—

मी घर सोडल्यानंतर गायत्री साधनेसाठी रहात होतो. तेथे माझे मन स्थीर होईना. म्हणून मी तेथून निघून इकडे तिकडे हिंडण्यास सुरुवात केली, आणि शेवटी पालनपूरजवळ 'बालाराम' म्हणून एक क्षेत्र आहे तेथे पोहोचलो. तेथील वातावरण अत्यंत पवित्र व उत्साहजनक वाटल्याने तेथे मी ३–४ दिवस साधनेसाठी घालविले. तेथेही मला काही समजेना पण मला एकदम निरुत्साह वाटू लागला व कंटाळा आला आणि माझे मन पुन्हा अस्थीर झाले.

मला आता माझे आयुष्य अशाच रितीने जाणार ह्या कल्पनेने जवळच असलेल्या एका नदीत उडी घेऊन आत्महत्या करावी असे वाटले. नंतर मी माझी शेवटची प्रार्थना तेथेच असलेल्या एका शिव मंदिरात आटोपून नदी किनाऱ्यावर पोहोचलो.

मी डोळे मिटले व गायत्री मंत्राचे स्मरण केले. ह्या वेळी माझे जवळपास कोणीही नव्हते असे पाहून, मी नदीत उडी मारणार इतक्यात एक काळा पोशाख केलेला लांब दाढी व केस असलेला तेजस्वी दृष्टीचा एक फकीर माझ्याजवळ आला व त्याने मला पकडले, व मागे खेचले. मजकडे पाहून त्याने मधुर स्मित केले.

त्याने मला त्याचेबरोबर येण्यास सांगितले. त्याच्या शद्वात अशी काही जादू होती की मी यंत्राप्रमाणे त्यांचे मागून चालू लागलो. आम्ही जवळच असलेल्या 'चैत्रासनी' रेल्वे स्टेशनवर आलो. त्याने मला 'कलोल' स्टेशनचे जे आमच्या गावापासून (सरघव) जवळ आहे. त्याचे तिकीट मला दिले, व तो एकदम अदृष्य झाला. मी त्याला ओळखू शकलो नाही.

त्यानंतर पुन्हा मी वारंवार हिमालयात गेलो, व शेवटी साधनेसाठी नर्मदातीरी करनाळीस येऊन राहिलो. बरोबर तीस वर्षानंतर असा एक प्रसंग घडला की मला डिसेंबर १९७६ मध्ये 'दत्तजयंती' निमित्य सुरत येथे असलेल्या 'श्री साई मंदिरात' श्री बाबांचे पूजन व गायत्री यज्ञाचा कार्यक्रम ह्यासाठी बोलावणे आले.

नेहमीप्रमाणे मी निजण्यापूर्वी ध्यानासाठी बसलो. ह्यापूर्वी मला कोठेही शिरडी किंवा इतरही श्री साई मंदिरात जाण्याचा योग आला नव्हता. म्हणून मी श्री बाबांची प्रार्थना केली की आपण ह्या आपल्या पूजा समारंभाला माझी कशी काय निवड केलीत ? व नंतर मला झाप लागली. मला स्वप्नात त्या महान विभूतीने श्री साई-नाथांनी दर्शन दिले आणि विचारले, तू मला कसा विसरलास, तीस वर्षापूर्वी 'बालाराम'ला नदीत आत्महत्या करायला निघाला होतास ना ? त्यावेळी तुला कोणी वाचविले ?

हे शद्ब ऐकल्याबरोबर मी जागा झालो. माझ्या डोक्यात एकदम लख्ख प्रकाश पडला. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही.

नित्याप्रमाणे मी लगेच उठलो. स्नान वगैरे आटोपले व ध्यानस्थ बसलो व अतिशय चकित झालो. मला गायत्री देवीचे ऐवजी 'श्री साईनाथ' दिसले. त्यावेळी मला जो आनंद झाला त्याचे वर्णन मी शद्वात करू शकत नाही.

दुसरे दिवशी मी सुरतेस ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे 'श्री साईपूजन' व गायत्री यज्ञाच्या उत्सवासाठी गेलो.

१२ सप्टेंबरच्या पुण्यतिथी निमित्याने

२१४

# श्री म्हाळसापती भगत

• साईनंद



श्री म्हाळसापती भगत श्रीसाईबाबांसमवेत

● श्रीसाईनाथ महाराजांच्या तत्कालीन निकटवर्तियांपैकी त्यांचे निष्ठावान सेवक म्हाळसापती भगत हे एक अलौकिक भक्त होऊन गेले. अत्यंत निस्वार्थी व वैराग्य वृत्तीने जीवन कंठणाऱ्यांमध्ये म्हाळसापतींचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हवा. शिरडी क्षेत्राला आजचे पावित्र्य प्राप्त झाले आहे, ते श्रीसाईनाथांच्या चरणस्पर्शामुळे हे खरे. परंतु ते आजपावेतो टिकून राहिले आहे व त्याचे माहात्म्य उत्तरोत्तर वाढत गेले आहे, ते म्हाळसापतींसारख्या निस्सीम भक्तांकडून भक्तीचा डांगोरा पिटला गेला आहे म्हणून !

म्हाळसापती चिपणाजी नागरे हे जातीने तसेच व्यवसायाने सोनार व पिढीजात शिरडीचे राहणारे होते. लहानपणापासूनच म्हाळसापती हे खंडोबारायाचे उपासक

होते. पूर्ववयात ते सोनारकीचा धंदा करीत असत. परंतु तन-मन-धन ईश्वरभक्तीकडे अर्पण केलेले असल्यामुळे त्यांना धंद्यात यश आले नाहीं व अखेरीस ईश्वरी प्रेरणा होऊन त्यांनी आपला पिढीजात सोनारकीचा धंदा सोडला व भिक्षावृत्ती स्वीकारली.

यानंतर उर्वरित आयुष्य त्यांनी खंडेरायाच्या सेवेत घालविण्याचा निर्णय घेतला. त्याशिवाय आपले सहकारी काशिराम शिंपी व अप्पा जागले ह्यांच्या सहकार्याने यथाशक्ती साधुसंत, बैरागी, फकीर, अतिथी ह्यांचा ते आदरसत्कार करू लागले.

अशा प्रकारे आयुष्याची कालक्रमणा चालू असता एकदा राहात्याच्या बाजूने एका मुसलमानाच्या वऱ्हाडाबरोबर श्रीबाबा शिरडीत आले. म्हाळसापती श्रीखंडोबाच्या देवळात पूजा करीत असताना त्या वऱ्हाडातील एक तरुण मुसलमान साधू देवळात आला. तेव्हा मागे वळून सत्कार करताना म्हाळसापती म्हणाले,

'आवो, साईबाबा'

तेव्हापासून साईबाबा हेच नाव त्यांनी धारण केले व आज त्रिभुवनात शिरडी व श्रीसाईबाबा ही नावे प्रातःस्मरणीय झालेली आपण पाहात आहोत. एका भक्ताने, नवे नाव देण्याची अशीच एक घटना, बनारसच्या 'आनंदमयी माँ' यांच्याही बाबतीत घडलेली आहे. त्या घटनेची नोंद या इथे करायला हरकत नसावी. बालपणापासून त्यांना निर्मलादेवी याच नावाने संबोधण्यात येई. आता ज्याला 'बांगला देश' म्हणतात. त्यातल्या खूरा इथे त्यांचा जन्म झाला होता. ३० एप्रिल १८९६ हा त्यांचा जन्मदिन.

१९२४ साली, डाक्का शहरी आल्या आणि भोलानाथ नावाच्या आपल्या पतीसमवेत त्या राहू लागल्या. आपल्या धार्मिक आचरणाने, त्यांनी बऱ्याच लोकांना दिपवून टाकले होते.

'ज्योतिष रे' हाच त्यांचा पहिला महान भक्त. बाई सदोदीत समाधी अवस्थेत असायच्या. 'ज्योतिष रे' याने त्यांचे पहिले दर्शन मिळविले असावे. बाईच्या चेहऱ्यावर सदोदीत स्मित हास्यच चमकत असायचे.

ज्योतिष रे त्यांना म्हणाला,

माँ तुम्ही पुण्यमयी आहा, तुम्ही आनंदमयी आहा. यापुढे आम्ही तुमचे भक्त, तुम्हाला आनंदमयी देवी याच नावाने संबोधणार आहोत.'

आपल्या नावातील या बदलाला त्यांनी मान्यता दिली. पुढे त्या म्हणाल्या,

' नियतीने ठरविले होते की, ज्योतिषने मला नवे नाव द्यावे. त्याने सुचविले आणि त्याने सुचविलेल्या त्या नव्या नावाचा मी स्वीकार केल शिरडीतल्या खंडोबाच्या देवळाचा पुजारी म्हाळसापती यानेच साईबाबांना श्र। बाबा हे नाव दिले.

आणि शिरडी पुण्यनगरी ठरली.

श्रीबाबांच्या प्रथम भेटीच्या ह्या दिव्य क्षणापासून म्हाळसापतींना श्रीसाईबाबांच्या अखंड साठ वर्षांच्या सहवासाचे परमभाग्य लाभले व श्रीबाबांच्या कृपाप्रसादाने त्यांचे सारे जीवन उजळून गेले !

सुरुवातीस श्रीबाबा कित्येक वेळा विक्षिप्तपणे वागत, त्यामुळे हा कुणी वेडा असावा, असा काही लोकांचा ग्रह होई. पण म्हाळसापतींसारख्या निष्ठावान भक्तांवर याचा काहीही परिणाम होत नसे.

म्हाळसापती श्रीबाबांची रोज पूजा करीत असत. सुरुवातीला श्रीबाबा कप ळाला गंध लावू देत नसत. पण पुढे त्यांनी म्हाळसापतींना एका दृष्टांताद्वारे कपाळाल गंध व हाताला उटणे लावण्याची सूचना केली तेव्हापासून ती प्रथा चालू झाली.

१० डिसेंबर १९०९ पासून चावडीत श्रीबाबांची समारंभपूर्वक पूजा होऊ लागली. आरती झाल्यानंतर देशपांडे उर्फ 'श्यामा' चिलीम तयार करून भक्त तात्याबांचे हाती देत असत. तंबाखूची ज्वाला निघू लागल्यावर तात्याबा ती चिलीम श्रीबाबांकडे देत. त्यांनी प्रथम झुरका घेतल्यानंतर ती ते म्हाळसापतींना देत, अशा रीतीने चिलीम विझेपर्यंत तिची वर्तुळाकार देवाणघेवाण चालू असे.

श्रीबाबा एक रात्र मशिदीत व एक रात्र चावडीत झोपत असत. भक्त तात्याबा व म्हाळसापती हे दोघे श्रीबाबांसमवेत नित्य मशिदीत शयन करीत असत. सर्वत्र निजानीज झाल्यानंतर त्या तिघांच्या रात्रभर गोष्टी चालत असत. असा झोपण्याचा क्रम अव्याहतपणे चौदा वर्षे चालू होता.

सुरुवातीला श्रीबाबा हंडीत स्वतःच्या हाताने अन्न शिजवीत व विधीपूर्वक देव-देवतांना नैवेद्य दाखविल्यानंतर पहिल्याप्रथम तात्याबा व म्हाळसापती यांना प्रसाद पाठवीत व मगच ते इतरांना वाढण्यास देत.

म्हाळसापतींसारखा निष्ठावान व आज्ञाधारक भक्त विरळाच ! श्रीबाबांनी त्यांच्या अनेक प्रकारे कसोट्या घेतल्या. पण म्हाळसापती त्या सर्वांतून यशस्वीरीत्या बाहेर

पडले. एकदा श्रीबाबांनी तीन दिवस समाधी लावून म्हाळसापतींना आपले शरीर सांभाळण्यास सांगितले होते. म्हाळसापती अहोरात्र तीन दिवस श्रीबाबांचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन बसले होते.

व्यवहाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष असल्या कारणाने म्हाळसापतींचा संसार नेहमीच ओढघस्तीचा असे. पण त्याची त्यांनी यत्किंचितही पर्वा केली नाही. सर्व भार श्रीबाबांवर टाकून ते परमार्थात मग्न असत. खुद्द श्रीबाबा रोज शेकडो रुपये वाटीत असत, पण त्यातली एक कपर्दिकही स्वतः म्हाळसापतींना देत नसत. तसेच दुसऱ्यांनी देऊ केलेली मदतही त्यांना घेऊ देत नसत.

भगवान श्रीकृष्णाचा उद्धव, समर्थ दासांचा कल्याण, त्याच कोटीतले म्हाळसापती हे श्रीसाईनाथांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांचे चारित्र्य गंगाजलाप्रमाणे निर्मळ होते व त्यांनी केलेल्या त्यागाला तोड नव्हती. संसाराकडे लक्ष न देता त्यांनी श्रीबाबांची पाच तपे मनोभावे सेवा केली. ते चांगले अधिकारी गृहस्थ असून पूर्ण निरपेक्ष वृत्तीने राहत. त्यांच्यापासून श्रीबाबांच्या भक्तांना बोध व आनंद नित्य मिळत असे; किंबहुना श्रीबाबांच्या पश्चात् त्यांच्या भक्तांना ते एक निवासस्थानच होते.

भाद्रपद शके १८४४ मंगळवार दि. १२ सप्टेंबर १९२२ रोजी म्हाळसापती साईचरणी विलीन झाले. म्हाळसापतींची समाधी शिरडी येथे त्यांच्या चिरंजीवांच्या मार्तंड महाराजांच्या राहत्या घरात आहे. देशाच्या दूरदूरच्या भागातून नित्य भक्तमंडळी तिथे येत असतात. म्हाळसापतींच्या निर्वाणानंतर श्रीखंडेरायाची व साईबाबांची सेवा मार्तंडभक्तांनी तशीच पुढे चालविली आहे. या म्हाळसापतींच्या चिरंजीवांचे वय जवळ जवळ ९५ च्या घरात आहे.

## नांदा सौख्यभरे

श्रीसाईलीलाच्या एक कवयित्री सौ. वसुंधरा रामराव चोरे यांची कन्या कु. निना हिचा विवाह श्री. शरदचंद्र दत्तात्रय खराडे यांचे बरोबर १४-८-८२ रोजी ब्राह्मण सहाय्यकसंघ हॉल, शिवाजी पार्क, दादर येथे थाटाने साजरा झाला

वधू वरांचे अभिष्ट चिंतन

# जीवनाची नौका हाकणारा नावाडी—भगवान साई

—कु. वत्सला मु. आजगांवकर
पुष्पांजली ब्लॉक बी/२ गोशाळा लेन
तळमजला मालाड पूर्व, मुं. ६४

● गेली २५ वर्षे मी नियमितपणे दरवर्षी शिरडीला जात होते व साईसच्च-रिताचा सप्ताह घरी वर्षांतून एकदा करीत असते. मी इन्कमटॅक्स ऑफिसमध्ये ३५ वर्षे नोकरी केली व १९८१ च्या मार्च ३१ ला सेवानिवृत्त झाले. लोअर डीव्हीजन क्लार्क म्हणून सुरुवात करून सुपरवायझरपर्यंत श्री बाबांच्या कृपेने शेवटचे प्रमोशन मी घेतले. माझा एक पाय पोलिओमध्ये लहानपणी गेलेला असून एक डोळाही लहानपणी देवीमुळे दगावला आहे. अशा परिस्थितीत मी बाबांची भक्तीने सेवा माझ्या परीने करीत आहे. मी सेवानिवृत्त झाल्याबरोबर बाबांची जास्त सेवा करायचं ठरवलं होतं पण त्या आधी जवळ जवळ वर्षभरापासून आजारी पडले व आता जरा बरं आहे. पण वृद्धावस्थेमुळे आधीच व्यंगी असलेल्या देहाकडून इच्छेप्रमाणे कामं करून घेणं मुष्कील होतं. तरी श्री बाबांनाच मध्यस्थी ठेवून आज हे लिहायचं धाडस करीत आहे.

माझा जन्म एका नास्तिक कुटुंबात १९२३ मध्ये झाला. माझे वडील त्यावेळचे बी. ए. एलएल. बी. रत्नागिरीत वकीली करीत होते. ते अत्यंत नास्तिक होते. पण मी मनाशी निश्चय केला होता की मला जर काही अलौकिक आध्यात्मिक अनुभव आले तर मी जरूर त्यात जास्त लक्ष घालीन. माझं आयुष्यच इतक्या चमत्कारिक-रित्या उभारलेलं आहे की त्याचा जास्त उल्लेख न करता फक्त श्री बाबांच्या स्वानुभवांचे काही नमुने मी या लेखाद्वारे देणार आहे.

माझ्या साधनेच्या प्रारंभकाळी त्यावेळच्या माझ्यापेक्षा वयोवृद्ध मंडळींनी मला शिरडीच्या साईबाबांची भक्ती करायचा सल्ला दिला व मी त्या मार्गाला अल्प प्रमाणात लागले. त्यानंतर जेव्हा जेव्हा माझ्यावर काही संकट यायचं तेव्हा तेव्हा श्री बाबांनी त्याची जाणीव अगोदर स्वप्नात करून द्यायची व त्याचं निरसनही ते स्वतः करायचे. असाच एक माझ्या आयुष्यातला पहिला नमुना. सुमारे ३० वर्षापूर्वीची गोष्ट. मी ऑफिसमध्ये दुसऱ्या टेबलचं काम पहात होते. पण त्यावेळच्या माझ्या हेडक्लार्कने डीसपॅचचं एक लेटर डीसपॅच क्लार्कच्या गैरहजेरीत मला घ्यायला सांगितलं. तेव्हा हेडक्लार्कला नाही म्हणायची आतासारखी हिंमत नव्हती. ते लेटर म्हणजे एक अर्ज

होता. तो मी घेतला व डीसपॅच टेबलवर टाकला व नंतर माझ्या कामाला लागले. नंतर दोन-तीन वर्षांनी माझी बदली दुसऱ्या सेक्शनमध्ये झाली. त्यावेळी एका रात्री बाबा माझ्या स्वप्नात येऊन नुसतं फॉर्म म्हणाले, मी नमस्कार केला व विचारलं फॉर्म म्हणजे काय? तरीही 'फॉर्म' म्हणाले व तिसऱ्यांदा पण 'फॉर्म' म्हणाले. मला काहीच उलगडा होईना. दुसऱ्या दिवशी ऑफिसात गेले तेच एका ओळखीच्या ऑफिसरने सांगितलं की 'तुम्ही एक ३-४ वर्षांपूर्वी फॉर्म रिसीव्ह केला आहे. कॉपीवर तुमची सही आहे. तो कुठे मिळत नाही. तरी यावर तुमचं एक्सप्लेनेशन असीस्टंट कमिशनरने मागितलं आहे. एवढंच करून तो असीस्टंट कमिशनर थांबला नाही तर माझ्या कॉनफिडेन्शअल रिपोर्टला त्याची नोंद त्याने केली होती आणि खरोखरच दुसऱ्या दिवशी माझ्याकडे एक्सप्लेनेशनसाठी ते आलं. नंतर एका साई-भक्त सुपरवायझरमार्फत मी त्या असीस्टंट कमिशनरला विनंति केली व त्याने तो रीमार्क C. R. मधून काढून टाकला. तो असीस्टंट कमिशनर त्या साईभक्त सुपर-वायझरचा स्नेही निघाला. हा माझा पहिला अनुभव आहे. माझ्या जीवनात ईश्वरी शक्तीचा परिचय करून देणारा.

दुसरा अनुभव—माझा भाऊ श्री. दत्तात्रय मुकुंद आजगांवकर हा 'प्रॉव्हिंशियल एक्साइज' दारूखात्यामध्ये इन्स्पेक्टर असताना त्याच्याकडे कंपनीच्या लीक्वीडचा स्टॉक असायचा. ह्या स्टॉकवर एकदा त्याच्या वरिष्ठांनी धाड घालायचं ठरवलं आणि वरिष्ठांची आणि त्याची नाती काही कारणास्तव बरी नव्हती. अशा वेळेला तो घाबरला कारण त्याच्या ताब्यात असलेलं स्पीरीटचं पिंप; स्पीरीट हवेत उडून गेल्यामुळे नेहमी आहे त्याच्यापेक्षा कमीच भरतं म्हणून त्याला भीती वाटत होती. ते मी ऐकल्यावर बाबांना प्रार्थना केली की 'बाबा हे संकट तुम्हीच निभावून न्या. मग ती दोघं नवरा-बायको शिरडीला येतील. आणि काय आश्चर्य प्रत्यक्ष जेव्हा रेड पडली तेव्हा स्पीरीट खरोखर असायला पाहिजे त्याच्यापेक्षा जास्तच भरलं.

तिसरा अनुभव माझ्या कामवालीसंबंधी आहे. तिला एक पिसाळलेला कुत्रा चावला. त्याच्यावर इन्जेक्शनं घेणं तिला आवश्यक होतं पण ती घाबरली व दोन इन्जेक्शनं घेऊन ती स्वस्थ बसली. नंतर थोड्या दिवसांनी तिला खूप दुखायला लागलं, म्हणून माझ्याकडे सांगून रडकुंडीला आली तेव्हा मी डोळयात पाणी आणून बाबांना प्रार्थना केली की तिला बरं वाटू द्या. नंतर सातआठ दिवस ती कामाला आली नाही व ज्या दिवशी आली त्या दिवशी तिने मला सांगितलं की आपल्या स्वप्नात एक दाढीवाला डोईला फडके बांधलेला एक साधु आला व आशीर्वाद दिला. तेव्हापासून दुखायचं थांबलं. हे अनुभव मी आजवर कुठेही प्रसिद्ध केलेले नाहीत. ❁

# सद्गुरु कृपा

—श्री. स. त्र्यं. कुलकर्णी, रि. डे. कलेक्टर, एम्. ए.
२४६५ ए वार्ड—कोल्हापूर

● श्रीसद्गुरु साईनाथांच्या भक्तांवरील कृपेच्या अघटित लीला साईभक्त साईलीलेतून नेहमीच वाचत असताव. सर्व साईभक्तांना निरनिराळे अनुभव हरघडी येतच असतात.

आमचे घरी सर्वजण साईभक्त आपआपल्या वेळी पूजा करतात. जमेल त्या प्रमाणे श्रीसाईसच्चरिताचे पारायणही करीत असतात. गेल्या वर्षी जुलै-ऑगष्टचे दरम्यान माझा मुलगा चि. शंकर याने पारायण केले. ते संपण्यापूर्वी दोनतीन दिवस समोरचे घरातील मुलगा उदय हा त्याचेकडे काही कामासाठी आला. आमचे घरातील श्री बाबांची पूजा फोटो व चित्रे पाहून त्याला म्हणाला की मला माझ्या एका मित्राने शिर्डीहून आणून दिलेली भव्य व सुंदर छबी आहे. फ्रेमला खर्च फार म्हणून मी फ्रेम करत नाही. तुला आणून देतो. असे सांगून निघून गेला तो सांगतेच्या आदल्या रात्री आणून दिला. शंकरने घरातील एक सुंदर फ्रेम तयार करून त्यांना ती सुंदर व भव्य छबी स्थानापन्न केली. अवतरणिका वाचणेपूर्वी या शिर्डीहून आलेल्या भव्य प्रतिमेची पूजा केली नंतर यथासांग वाचन पूजा व नैवेद्य झाला. आमची प्रामाणिक व नम्र भावना अशी की श्रीबाबांनी स्वतः येऊन मुलाने केलेल्या पारायणाची सेवा व नैवेद्य स्वीकारला.

अगदी अशीच एक घटना अगदी अलीकडे घडली. माझ्या पत्नीने अद्याप सच्चरित्राचे स्वतः असे पारायण केले नाही. मागील महिन्यात एक ज्येष्ठ नि श्रेष्ठ साईभक्त प्राध्यापक श्री. र. श्री. पुजारी यांच्या 'श्रीसाईमाहात्म्य' या ओवीबद्ध प्रासादिक ग्रंथाचे पारायण केले. समाप्तीचे दिवशी अवतरणिका वाचून पूजा केली व प्रतिमेसमोर उभी राहून नैवेद्य दाखविणार एवढ्यात पोष्टमनने हाक दिली. त्याने दिलेला लखोटा उघडून पाहिला तर तो श्रीसाईसुधा सभा, गरखल, (हि. प्र.) यांचेकडून आलेला होता व त्यात श्रीबाबांचा एक जोड फोटो, उदीची पुडी असे होते. नैवेद्याचे ताट हातात घेऊन उभी असताना त्याचवेळी श्रीबाबा स्वतः येऊन 'वाढ गे पोरी मी आलोय' असे म्हणण्याचा भास झाला. आमच्या आनंदास पार नाही.

श्रीबाबा नेहमीच भक्तांच्या सर्वत्र मागे पुढे खालीवर सर्वत्र व्यापून राहिले आहेत, आणि तरीसुद्धा आपल्या वेड्या भक्तांच्या समाधानासाठी वरील प्रमाणे निरनिराळे प्रकारे खुणा पटवून देतात.

'तुमचा मी भार वाहिन सर्वथा। नव्हे हे अन्यथा वचन माझे॥ ही बाबांची उक्ती त्रिकालबाधित सत्य आहे.'

**श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीला दसऱ्याच्या मुहूर्तावर**
**प्रसिद्ध होत आहे.**

फक्त श्री साहित्याला वाहिलेले एकमेव वार्षिक

# ' साईप्रसाद '

**पाने १५०** **किंमत ८ रुपये**

सुप्रसिद्ध कवी लेखक लेखपाल, ले. कर्नल, डॉक्टर्स, वकील, ॲडव्होकेट, शिक्षक, पत्रकार प्रोफेसर वगैरे विविध व्यवसायी विचारवंतांचे सकस साईसाहित्य, साईकथा, निबंध, लेख, कविता...

' विविध साईदरबार, साईमंदिरे, साईसंत-भक्त ' ही सचित्र, ' जया मनी जैसा भाव ' ही विज्ञानाला आव्हान देणारी अनुभवमाला, ' साईचरणी लीन झालेले सिनेकलावंत ही अभिनव व ' आम्ही साईबाबांना प्रथम पाहिले आणि श्री साईंना प्रत्यक्ष पाहिलेल्या पुण्यवंतानी सजविलेली शब्दसुमनमाला अशा एकापेक्षा एक सुरस आणि सरस चार लेखमाला....वार्षिक राशीभविष्य. शिवाय बाबांच्या हयातीतील अनेक छायाचित्रासह मनमोहक रंगीत ' श्रीसाई ' छबीचे बोलके मुखपृष्ठ...

मागील वर्षीची ' श्रीसाईकृपा ' न मिळाल्यामुळे झालेली निराशा टाळण्यासाठी आपली प्रत अंकाची किंमत + ५ रु. रजिस्टर पोस्टेजचे खालील पत्त्यावर पाठवून आजच राखून ठेवा.

**विजय हजारे,** द्वारा कृपांशु प्रकाशन
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली पूर्व मुं. ४०००६६.

282

# श्री साईबाबा व ज्योतिषशास्त्र

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंडगार्डन रोड. पुणे ४११००१

● अलीकडे लग्ने ठरविताना पत्रिका पाहण्याचे खूळ जास्तच वाढले आहे. त्यातून मुलाकडील मंडळी तर आधी पत्रिकाच मागतात आणि बहुधा मंगळ आहे म्हणून किंवा गुण जुळत नाहीत म्हणून चांगली मुलगी देखील नाकारतात. तसेच आमचे राजकीय पुढारीदेखील निवडणूकीचा अर्ज भरताना, मंत्रीमंडळाच्या शपथविधी कार्यक्रम ठरविताना ज्योतिषाला मुहूर्त विचारून नक्की करतात.

या ज्योतिषशास्त्राला हल्ली जे अवास्तव महत्व दिले जाते ते बरोबर नाही. पहिली गोष्ट म्हणजे या शास्त्रांचा अलिकडे फार खोल अभ्यास होत नाही व त्यांची फारशी प्रगतीपण झालेली नाही. शिवाय या शास्त्रांची देखील काही सीमा आहे. मोठ्यातला मोठा ज्योतिषीसुद्धा कबूल करील की तो फार तर ९९ टक्के खरे भविष्य करू शकेल परंतु १ टक्का ईश्वराधीन असल्याने काहीही चमत्कार घडू शकेल.

दुसरे म्हणजे या शास्त्राच्या जगात फसविणारेच व पैसे लुटणारेच फार असतात. माणसाची साहजिक वृत्ति आहे की सदा सुख व यश हवे—संकट, दुःख, आजार व अपयश नको. पण संसारात हे काही कुणाला सुटले आहे का ? तरी माणूस हे टाळण्याचे मार्ग शोधीत असतो आणि नेमक्या या दुबळेपणाचाच हे ज्योतिषी फायदा घेत असतात. पत्रिका किंवा हात पाहून कोणास कोणते दुःख किंवा अडचण आहे हे जाणण्याचे तंत्र त्यांनी अवगत केलेले असते व ते नेमके सांगून गिऱ्हाईकांची श्रद्धा ते मिळवितात. नंतर त्यावर उपाय म्हणून ग्रहशांति, अनुष्ठान, जप वगैरेसाठी पैसे वारंवार उकळतात. एखाद्याची जर या गोष्टीवर खरोखरीच श्रद्धा असेल तर त्याने स्वतः ग्रहशांतिसाठी आपल्या पुराणात व शास्त्रात सांगितलेली स्तोत्रे व मंत्र यांचा पाठ करावा. उदा. शनीच्या साडेसातीसाठी शनिस्तोत्र, मारुतिस्तोत्र वगैरे प्रसिद्धच आहेत. उपासनेने काहीही साध्य होते. परंतु नुसता पैसा फेकून व ते यथायोग्य केले जाईल याची खात्री नसताना त्याच्या फळाची आशा करणे व्यर्थच नाही का !

एकाद्या शुभकार्यासाठी ज्योतिष पाळायचेच झाले तर मग ते यथायोग्य व सर्वच विधीत पाळले तर त्याचा फायदा.

आणखी एक अलीकडचे फॅड ( नाद ) म्हणजे वर्तमानपत्रातून/साप्ताहिकातून येणारे राशीवार साप्ताहिक भविष्य. हे वाचणारे व त्यावर ( लॉटरी मिळेल, अपघात होईल वगैरे गोष्टींवर ) विश्वास ठेवणारे कितीतरी लोक आहेत. याचा जर अभ्यास केला तर दोन ठिकाणी एकाच राशीबद्दल कित्येकदा अगदी विरोधी भविष्य आढळते. कोणीही खरा ज्योतिषी तुम्हाला सांगेल की कोणाचेही तंतोतंत भविष्य त्याच्या नुसत्या जन्म राशीवरून सांगता येत नाही. त्याला पूर्ण कुंडली, इतर ग्रहांची दृष्टी, त्याच्या अगदी जवळच्या नातेवाईकाची ( पति/पत्नीची ) कुंडली वगैरे अनेक गोष्टी पहाव्या लागतात. हे साप्ताहिक भविष्य म्हणजे गोचर ( ग्रहांची चालू स्थाने ) यावर आधारलेले असते. त्यात दशाफलांचा विचार केलेला नसतो. व्यक्तीच्या आयुष्याचे १०८ किंवा १२० वर्षे कल्पून त्याच्या अष्टोत्तरी किंवा विंशोत्तरी पद्धतीने ग्रहांच्या महादशा काढतात. मग प्रत्येक महादशेत ग्रहांच्या अंतर्दशा असतात आणि नंतर गोचर. उदा. एकाद्याची अष्टोत्तरीप्रमाणे गुरूची १९ वर्षांची महादशा चालली असेल व त्यात सध्या बुधाची ३ वर्षांची अंतर्दशा चालू असेल आणि त्यात सध्या गोचरमध्ये शनि पहिला किंवा दुसरा असेल ( म्हणजे साडेसाती असेल ) तर त्याला महादशेतला गुरु संरक्षण देणार नाही काय ? एकूण नुसत्या गोचर भविष्यावर विश्वास ठेवणे मूर्खपणाचे आहे.

आतापर्यंत ज्योतिषशास्त्राचा तर्कदृष्ट्या विचार केला. आता थोडासा तत्त्वज्ञानाने विचार करू या. खरे पाहिले तर पूर्वकर्माचे फळ म्हणून जे या जन्मात प्रारब्ध असते ते भोगावेच लागते. जीवनमुक्तालादेखील ते सुटत नाही. ज्योतिषशास्त्र किंवा हस्तरेखाशास्त्र त्याबद्दल थोडीशी कल्पना आपल्याला देऊ शकतात एवढेच. परंतु ईश्वराने मनुष्य प्राण्याला सारासार विचार करण्याची बुद्धि दिलेली आहे तिचा यथायोग्य उपयोग करून तो आपले भविष्य बरेच बदलू शकतो. कित्येक गोष्टीत बदल अशक्य असला तरी सत्कर्मे करून पुढल्या आयुष्याचा तरी भक्कम पाया तयार करू शकतो. संसारात सुखे व दुःखे दोन्ही येणारच. परंतु दुःखे आली किंवा येणार म्हणून रडत बसणे किंवा ज्योतिषाकडून शांति, जप वगैरेत पैसा व वेळ वाया घालविणे बरे नव्हे. आपल्या बुद्धीचा उपयोग करून त्या संकटातून मार्ग काढायचा प्रयत्न करावा. समर्थ रामदासस्वामींनी म्हटल्याप्रमाणे, 'मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे,' आणि काही दुःखे दैविक म्हणजे आपल्या उपायाबाहेरची असली तर ती अनिवार्य म्हणून सहन करण्यास माणसाने शिकले पाहिजे.

ज्योतिषशास्त्राबद्दल श्रीसाईबाबांची मते प्रसिद्धच आहेत. एकदा वांद्रे येथील रघुनाथराव तेंडुलकरांचा वैद्यकीय पाठशाळेतून परदेशी वैद्यकी शिक्षण घेत असलेला मुलगा बाबू याने रात्रीचा दिवस करून अति कसून अभ्यास केला होता तरी ज्योतिषाने यावर्षी ग्रहांचा जोर नाही असे सांगितल्यामुळे परीक्षेला बसत नव्हता. पुढे मुलाची आई शिरडीस बाबांकडे गेली असता बाबूच्या परीक्षेची गोष्ट निघाली व तिने बाबांस अभ्यासाची सर्व तयारी असून बाबू परीक्षेस जात नाही हे सांगितले.

ऐकून बाबा वदले वचन । सांगे तयास माझे मान ।
पत्रिका ठेवीं गुंडाळून । बैसे जा स्वस्थमन परिक्षे ॥ अ. २९ ओ. १०९ ॥

**नादा कुणाच्या लागू नका । जन्मपत्रिका पाहू नका ।**
**सामुद्रिका विश्वासूं नका । चालवा निका अभ्यास ॥ ११० ॥**

म्हणावे मुलास येईल यश । स्वस्थचित्ते परिक्षेस बैस ।
होऊं नको असा निराश । ठेवी विश्वास मजवरी ॥ १११ ॥

अशा प्रकारे बाबांची आज्ञा घेऊन मुलाची आई गावी परतली व मुलास निरोप कळविला. त्यानेही उत्साहभरित होऊन परीक्षेस बसण्याचे ठरविले आणि काय आश्चर्य ! ! लेखी आणि तोंडी दोन्ही परीक्षेत तो पास झाला.

असेच एकदा नाना डेंगळे नावाचे एक मोठे ज्योतिषी होते. त्यांनी बापूसाहेब बुट्टीना एक दिवस अशुभ आहे असे सांगितले व गंडांतर येणार असल्याने धीर धरून सावध-राहण्यास सांगितले. त्यामुळे बापूसाहेब अस्वस्थ होऊन सारखे चिंताग्रस्त झाले होते. हे पाहून बाबा त्यांना म्हणाले, "काय हे नाना काय म्हणतात ? तुला काय मारायला बघतात ? अरे आपल्याला कसली भीति. खुशाल त्यांना सांग, कसे मारतात ते पाहू !" आणि खरोखरीच त्याचदिवशी सायंकाळी बर्हिदिशेस शौचविधीस गेले असताना एक साप तेथे निघाला पण बाबांच्या कृपेने बापूसाहेब सुरक्षित राहिले.

अहमदनगरच्या सुखवस्तु दामूअण्णा यांना दोन स्त्रिया होत्या पण पुत्रसंतति नव्हती. त्यासाठी त्यांनी ज्योतिर्विद्येचा अभ्यासपण केला होता. परंतु नशिबी संतान नाही असे ज्योतिर्विद्येचे निदान जाणून निराश होऊन बसले होते. परंतु त्यांनाही बाबांनी चार आंबे देऊन धाकट्या स्त्रीला चार मुलगे व चार मुली होतील असे सांगितले आणि खरोखरच बाबांचे शब्द खरे ठरले व ज्योतिष निष्फल ठरले.

एकदा नाशिक-क्षेत्रस्थ अग्निहोत्री मुळेशास्त्री श्रीमंत बापूसाहेब बुट्टीबरोबर शिरडीस आले. ते ज्योतिर्विद्येत अतिप्रवीण असून सामुद्रिकातही तसेच पूर्ण होते. बाबांचे दर्शन होताच ते रमले व बाबांच्या चरणांचे ध्वज-वज्रांकुश-रेखांचे निरीक्षण करण्याचे त्यांचे मन झाले. त्यासाठी ते पुढे सरकले आणि सामुद्रिकासाठी बाबांचा हात मागण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु बाबांनी तिकडे लक्षच दिले नाही व त्यांचे हातावर चार केळी ठेवून त्यांची पाठवणी केली. पण हात काही दाखविला नाही. असो.

अशाप्रकारे बाबांनी ज्योतिषांनी सांगितलेली भविष्ये वारंवार खोटी पाडली आणि स्वतः कधी ज्योतिषाला हात पाहू दिला नाही. यावरून त्यांची शिकवण मनुष्याने ज्योतिषाच्या नादी न लागता पुरुषार्थ करीत रहावा अशीच होती. त्याचप्रमाणे आपल्या भक्तांची काही दुःखे अनिवार्य असत तेव्हा बाबा त्या भक्तांना तसाच शांतवनपर उपदेशही करीत असत. उदा. दीक्षितांची मुलगी वारली तेव्हा त्यांना फार दुःख झाले. कोणत्याही गोष्टीत त्यांचे मन लागेना. तेव्हा बाबांनी भावार्थ रामायण उघडून त्यातील किष्किंधाकांडातील वालीचा वध झाल्यानंतर तारा शोक करीत असताना रामाने उपदेश केला ते प्रकरण वाचावयास दिले. तसेच बेंद्रे यांचा मोठा मुलगा चार दिवसात मरणार होता त्याची बाबांनी त्यांना आधीच जाण दिली व उपदेश दिला. ' धीर धर त्रागा करू नकोस. '

माझ्या मते खऱ्या साईभक्ताला साईबाबांची उपासना हीच ग्रहशांति व गुरुवार हाच सर्व शुभकार्यासाठी मुहूर्ताचा दिवस असावा. यदाकदाचित् काही अडचणीमुळे तो दिवस धरता आला नाही तर कुठलेही कार्य हाती घेताना बाबांचे दर्शन व आज्ञा घेऊन त्याची सुरवात केली म्हणजे झाले. बाबांवरील श्रद्धेने त्या कामात कधीच अडचण येणार नाही आणि ते यशस्वीच होईल. परंतु क्वचित् प्रसंगी एकादे काम आपल्या मनासारखे झाले नाही किंवा काही दुःखद प्रसंग घडलाच तरी बाबांवरची श्रद्धा ढळू न देता ' बलीयस मनोगत बाबांचे ' हे ध्यानात आणून मन शांत ठेवायलाही आपण शिकले पाहिजे. लक्षात ठेवा आपले अंतिम कल्याण कशात आहे हे बाबांनाच ठाऊक आहे आणि ते जे करतील ते आपल्या चांगल्यासाठीच करतील.

सेवा कधीही जाई ना व्यर्थ । अंती तो कृतार्थ करील ॥ अ० ४५ ओ९ १५ ॥

284

# 'साई' एक श्रद्धास्थान!

—श्री. मुरलीधर घोलप
६५३, सहकारनगर, नं. २,
चेंबूर, मुं. ७१

● परवा एका मित्राने मला प्रश्न केला--तुम्ही साईभक्ती कां करता? मी त्याला उत्तर दिले. बाबारे, मी नास्तिक नाही आणि माझ्यापेक्षा बुद्धीप्रगल्भ लोकसुद्धा साई-भक्ति करतात, मी तुलनेने तर त्या लोकापेक्षा अगदी किरकोळ. त्या बुद्धीप्रगल्भ लोकांना तर माझ्यापेक्षा निश्चितच जास्त समज आहे. मी माझ्या त्या मित्राला नंतर एक गंमत सांगितली. प्रा. अनंत काणेकर ह्यांनी त्यांच्या 'अनन्तिका' ह्या आत्म-चरित्रात एक गोष्ट अगदी प्रांजळपणे कबूल केली आहे. प्रा. अनंत काणेकर आत्म-चरित्रात म्हणतात की—'काही वर्षांपूर्वी मी पंढरपूरला गेलो होतो, तेव्हा पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनाला गेलो. मूर्ती पाहिल्याबरोबर मी मूर्तीच्या पायावर डोके ठेवले. तिथल्या काही मंडळींना तर आश्चर्य वाटले. एकाने मला विचारलेसुद्धा— अहो तुम्ही, विज्ञानवादी सोशालिस्ट ना? मग हे काय? मी त्या मित्राला ताबडतोब उत्तर दिले 'मी विज्ञानवादी म्हणजे संशयवादी सोशालिस्ट आहे. ईश्वराचे अस्तित्व पटविणाऱ्य बुद्धीच्या पलीकडे असलेल्या साक्षात्कारी प्रतिभेचे मला देणे नसेल. मला पटलेले नाही असे मी अनेकवेळा म्हणतो. पण माझी बुद्धी कमी पडते म्हणून माझ्यापेक्षा अनंत पटीने मोठे असलेल्या ज्ञानेश्वर, तुकारामांनी ह्या विठोबाच्या मूर्तीसमोर डोके विनम्र केले आहे, त्यांना काही कळले नाही असे मला म्हणवत नाही. त्यांच्याबद्दल मला अपार आदर असल्यामुळे डोके लवणारच!'

प्रा. अनंत काणेकरांनी त्यांच्या आत्मचरित्रात नमूद केलेला वरील प्रसंग मी जेव्हा माझ्या मित्राला सांगितला तेव्हा तो निरुत्तर तर झालाच पण स्वतःला नास्तिक समजणारा तो मित्रही पुढे साई भक्ती करू लागला.

आपल्या देशाचे माजी अध्यक्ष (राष्ट्राध्यक्ष) मा. श्री. संजीव रेड्डी ह्यांनी नुकतीच शिरडीला भेट दिली व श्रीसाईंचे दर्शन घेतले. राष्ट्रपती आपणा पेक्षा किती तरी अनंत पटीने मोठे आहेत. ते जर साई भक्त आहेत तर मग आपण का नसू नये. राष्ट्रातील सर्वात मोठी व्यक्ती आदरणीय व्यक्ती जर साई भक्ती करते मग आपणच का मागे रहावे. अशा अनेक मोठ्या व्यक्ती आहेत, निरनिराळ्या क्षेत्रात

काम करणाऱ्या धनिक व्यापारी, कारखानदार, बुद्धीवादी व्यक्ती की ज्या साईबाबां-समोर लीन होतात, भक्ती करतात. साई भक्तीचा महिमा असा अगाध आहे. भक्तिने प्रेम वाढते नास्तिक माणूस सुद्धा भारावून जातो आणि भक्ती करू लागतो. भक्त गणांची संख्या आपोआप वाढत जाते. ज्ञान इतराना दिल्याने जसे ज्ञान वाढत जाते. त्यात भर पडते, तसेच साईभक्तीचा महिमा आहे. भक्ती वाढत जाते भक्तांची संख्या वाढत जाते. एक प्रकारची साखळी निर्माण होते.

मी माझ्या मित्राला जसे उदाहरण देऊन पटवून सांगितले व तोही साईभक्ति करू लागला, कदाचित् त्याच्या घरातले सर्वच जण साई भक्ती करतील आणि तो मित्र आता इतराना हेच सांगेल. म्हणजे ही एकप्रकारची भक्तीची साखळीच निर्माण होते.

शेवटी प्रत्येक व्यक्तीचे मनात कोठेतरी एक श्रद्धास्थान निर्माण होतेच. व्यक्ती ही कितीही प्रगल्भ विचारांची असली, पुरोगामी मतांची असली तरीसुद्धा त्या व्यक्तीचे एक कुठेतरी श्रद्धास्थान असतेच. डॉक्टर ऑपरेशन करण्यापूर्वी परमेश्वराची प्रार्थना करीत असतात (मनात) रुग्णाला वाचव. कारण डॉक्टरला सुध्दा बऱ्याचवेळा असे वाटते की काही गोष्टी ह्या परमेश्वराधीन आहेत. प्रयत्नांना म्हणजे मानवी प्रयत्नाना एक मर्यादा असतेच आणि त्यावेळी मग परमेश्वराची आळवणी सुरू होते. अर्थात प्रत्येक व्यक्तीची श्रध्दास्थाने वेगवेगळी असतात पण श्रद्धास्थान असतेच. अर्थात श्रद्धास्थाने वेगळी असली तरी शेवटी व्यक्तीने केलेली प्रार्थना आळवणी ही परमेश्वराजवळ रुजू होतेच. शेवटी सर्व नद्यांचे पाणी सागराला मिळते तद्वत कोणत्याही दैवताची केलेली प्रार्थना ही परमेश्वराजवळ रुजू होतेच.

★

285

# महानिर्वाणानंतरचे साईबाबा

—श्री. पां. बा. भुतकर
२३/१६७५, अभ्युदयनगर, काळाचौकी,
मुंबई–४०००३३

● महानिर्वाणानंतर साईबाबा भक्तांशी निःसंशयपणे बोलतात हे वाचून आपणास खरे वाटणार नाही. पण ही वस्तुस्थिती आहे. मरणोत्तरदेखील साई भक्तांशी तुम्हा आम्हा प्रमाणेच बोलतात. त्यांना हिताच्या चार गोष्टी सांगतात. त्यांच्या दैनंदिन व्यवहारात त्यांना मदत करतात. हे कसे शक्य आहे ?

वास्तविक पहाता संत मंडळी ही भक्तांच्या कल्याणाकरिता पृथ्वीवर अवतरत असतात. त्यामुळे जरी जड देहाने ते नष्ट झाल्याचा आभास झाला तरी ते कधीही नाश पावत नाहीत. सूक्ष्म रूपाने ते सर्व ठिकाणी सदैव संचार करीत असतात.

प्रत्यक्षात आपण नित्य अनुभवतो की संत वा थोर व्यक्ती यांच्या निर्वाणानंतरच त्यांचे खरे महत्त्व लोकांना समजते. खोलवर विचार केल्यानंतर आपल्या लक्षात येते की जड देह असताना संतांच्या सीमा मर्यादित असतात व म्हणून ते आपल्या सभोवताली असणाऱ्या भक्त मंडळींचीच व्यथा दूर करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याच कल्याणाची चिंता वहातात. जड देहाचा त्याग केल्यानंतर मात्र ते अनंत अंतराळात सामावून जातात. अथांग अंतराळात असल्यामुळे ते अनंत भक्ताची दुःखे दूर करू शकतात. त्यांचे क्षेत्र व्यापक होते. पूर्वीचे संकुचित क्षेत्र व नंतरचे व्यापक क्षेत्र यामुळेच देह त्यागानंतर त्यांची कीर्ती उत्तरोत्तर वृद्धींगत होते असे आपणास आढळून येते.

ज्यावेळी भक्तावर एखादे संकट येते त्यावेळी हे संत अगर महात्मे त्याला मदत करण्याच्या सद्हेतूने आपले पूर्वीचे रूप अगर दुसरे एखादे रूप घेऊन येतात व योग्य ती मदत केल्यानंतर ते ताबडतोब अंतराळात विरून जातात. नंतर भक्ताच्या लक्षात ही गोष्ट येताच लगेच ते त्या संताचा शोध घेऊ लागतात त्यावेळेपर्यंत ते संत अथवा महात्मे लुप्त झालेले असतात.

साईबाबांना देखील या गोष्टी पूर्वीपासून ज्ञात होत्या यात मुळीच संदेह नाही. त्यांनी मीच काय पण माझी हाडे देखील समाधीतून बोलतील व भक्तांचे कल्याण करतील याची ग्वाही दिलेलीच आहे.

झालो जरी गतप्राण ।
वाक्य माझे माना प्रमाण ।
माझी हाडे तुर्बतीमधून ।
देतील आश्वासन तुम्हास ।।
मी काय पण माझी तुर्बत ।
राहील तुम्हासवे बोलत ।
जो तीस अनन्य शरणागत ।
राहील डोलत तयासवे ॥

साईलीला मासिकातून साईबाबांनी त्यांच्या देहत्यागा नंतर अनेक भक्तांना प्रत्यक्ष रूपात अगर अन्य रूपात मदत केल्याची कित्येक उदाहरणे] आपण वाचतो. यापुढेही कितीतरी अनुभव प्रसिद्ध होतील. यावरून साईंचे वास्तव्य किती विस्तृत आहे याची प्रचिती येते. फक्त त्यासाठी मनाची सर्व शक्ती, विश्वास साईबाबांच्या ठिकाणी एकवटला पाहिजे. अर्थात हे मीच सांगतो असे नव्हे. बाबांनीच याबाबत मार्ग दर्शन केले आहे.

मात्र माझे करा स्मरण ।
विश्वासयुक्त अंःतकरण ।
ठेवा करा निष्काम भजन ।
कृत कल्याण पावाल ॥

सध्या आपण दूरदर्शन पहातो त्याचे वरून आपणास कल्पना येते की चित्राचे विकेंद्रीकरण करून ती हवेतून पाठविली जातात व नंतर आपल्या दूरदर्शन संचामध्ये एकत्रिकरण होऊन हुबेहुब ती प्रतिमा आपणास बोलत चालत असताना दिसते. या वरून एक गोष्ट निश्चितपणे आपणास समजेल की ज्यांची शक्ती सर्वगामी आहे अशा थोर संतांना अंतराळातून परत आपल्या स्वरूपात प्रगट होऊन आपल्या परमप्रिय भक्तांशी बोलणे चालणे त्यांना दर्शन देऊन पावन करणे किंवा त्यांची ऐहिक कामे करणे सहज शक्य आहे. म्हणूनच प्रथम सांगितल्या प्रमाणे दिव्य शक्ती प्राप्त झालेल्या साईबाबांना अशक्य असे काहीच नाही.

देहधारी म्हणूनि जित ।
समाधिस्त जे ते काय मृत ।
साई जनन मरणातीत ।
सदा अनुस्यूत स्थिरचरी ॥

卐

# धन्य झाले झाले श्रीसाई दर्शन

—श्री. द. बं. बर्दापूरकर (गुरुजी)
लोनावळा, जि. पुणे

● निसर्ग रम्य लोनावळा नगरात नित्य नेमाने 'साई सत्संग मंडळात संत ग्रंथाचे वाचन व त्यावर चर्चा होत असते.

एकदा एका साई भक्ताने गुरुपौर्णिमा निमित्य साई ग्रंथाचे पारायण कराल का म्हणून मला विचारले मी तात्काळ होकार दिला. दिवस निश्चित झाला पारायणास सुरुवात झाली मी अध्याय वाचू लागलो. तसा माझा आनंद वाढू लागला व माझी बाबांच्यावर श्रद्धा बसली. पारायण संपले. आरती तीर्थप्रसाद पुष्पांजली झाल्यावर मी बाबांच्या मूर्तिकडे टक लावून पाहू लागलो न कळत माझ्या मुखातून 'बाबा दर्शन दे एक बार' शब्द बाहेर पडले बाबांच्या चरित्रातून अध्यात्मिक व सर्व धर्म समभावाचे दर्शनाचा अलभ्य लाभ झाला.

मी रोजच्याप्रमाणे सत्संगास आलो असता कार्यक्रम संपल्यावर एक साई भक्त मला म्हणाला गुरुजी, 'हे घ्या तिकीटाचे पैसे व बाबांचे दर्शन करून या' मी आश्चर्य चकीत झालो. दुसऱ्या दिवशी शिर्डीस आलो. ते मंदिर त्या पवित्र परिसरातील मंगल मय वातावरण व ती भव्य बाबांची मूर्ती पहाता क्षणीच डोळ्याचे पारणे फिटले प्रसन्न मनाने मंदिरात जाऊन मनसोक्त बाबांचे दर्शन झाले मुखाने गुरु स्तवन म्हणू लागलो डोळ्यांनी बाबांचे मोहक सगुण रूप पाहू लागलो, बराच वेळ पहात होतो. बाबांचे महावाक्याची स्मृति झाली 'तु मेरा तो मैं तेरा' अनुभव आला झाले समाधान देखिले बाबांचे चरण—

गुरूवारचा अथपासून इतिपर्यंत कार्यक्रम पाहून व साईभक्तांची बाबावरची श्रध्दा व प्रेम पाहून मी थक्कच झालो. मला दुसरी पंढरीच भासली नंतर बाबांची पवित्र स्थळे पाहून झाल्यावर बाबांना अंतःकरणापासून नमस्कार करून व त्यांना डोळे भरून पाहिले व श्रद्धांजुलीने 'भरूनी सद्भावाची अंजुली मी ओवलीया फुले मोकळी ती अर्पिली साई चरणी प्रेमभावे' ही माझी मानसीक सेवा साई चरणी समर्पण केली.

साई बाबा चरित्र पारायणाचे हे फल आहे असे आता माझे निश्चित मत आहे.

# श्रीसाईबाबांचा धर्म

☆✡✡✡✡☆✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡

—विजय द. हजारे, एम. ए.
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड
बोरीवली पूर्व मुं. ४०००६६

● जरी मी गेलो हे शरीर टाकून
तरीही धावेन भक्तांसाठी ।

असं म्हणणारी शिर्डी क्षेत्रीची साईमाऊली, आज ६४ वर्षे झाली आपल्या नश्वर शरीराचा त्याग करून ह्या मानवी हिशोबी संसारचक्राप्रमाणे ब्रह्मांडात विलीन झाली आहे. तरीदेखील आजही ती आपल्या भक्ताला ह्या ना त्या रूपात दर्शन देते, प्रचिती देते. दृष्टांत देते. अर्थात 'जैसा जैसा भावे तैसा तैसा पावे' ह्या प्रमाणात! वर्षामागून वर्ष जात आहेत आणि श्रीसाईबाबांच्या अधिकाधिक भक्ताना वाढत्या प्रमाणात त्यांच्या वरील वचनाची सत्यता अनुभवास येत आहे. त्यामुळेच बाबांचे भक्तगण दिवसेदिवस वाढत आहेत. फक्त हिंदू-मुस्लीमच नव्हे तर शीख, पारशी, ख्रिश्चन, बौद्ध, जैन वगैरे वेगवेगळ्या पंथाचे, धर्माचे लोक श्रीबाबांच्या दर्शनासाठी त्यांच्या समाधिमंदिरात. शिर्डीला त्यांच्या दरबारात हजेरी लावण्यास जात येत आहेत. प्रत्येकजण श्रीसाईबाबांना आपल्या धर्माचं मानण्याचा मनोमन प्रयत्न करीत आहे. अर्थात् त्यात कुणाचंही चुकत नाही. कारण चराचरी भरून राहिलेला श्रीसाई परमात्मा हा प्रत्येकाचा आहे. विश्वव्यापी परमेश्वर जेथून पहाल तसा तो दिसेल. तुमच्य इष्ट देवदेवतांच्या स्वरूपात! रामदासीला अयोध्येच्या रामाचं तर दासगणू महाराजांना आपल्याच जागी त्यांच्या आवडत्या पंढरीच्या पांडुरंगाचं दर्शन घडविणारे श्रीसाईबाबा खरंच कुठल्या धर्माचे होते हे सांगणंच कठीण. फकीराचा वेष परीधान करणारे, मशिदीत राहणारे म्हणून त्यांचा मुस्लीम धर्म म्हणावा तर आपल्या मशिदीला श्रीकृष्णाच्या द्वारकेचे नाव देणारे, तिला 'द्वारका माई' संबोधून आपल्या हयातीपासून तो आजतागायत तेथे 'धुनी' प्रज्वलीत करून ठेवणारे, संत ज्ञानेश्वरांप्रमाणे एका मोलकरणीच्या तोंडून वेदान्ताचा अर्थ स्पष्ट करणारे श्रीसाईनाथ हिंदू धर्माचे असावेत असं वाटू लागतं. आपल्या 'फायर टेंपल' शिवा य इतर कोणत्याही धर्मस्थानाला तीर्थ क्षेत्राला भेट न देणाऱ्या पारशी धर्मीयांची पारशांची श्रीबाबांच्या चरणी असलेली अढळ श्रद्धा पाहून पुन्हा श्रीसाईबाबांचा धर्म पारशी तर नव्हता ना असं

उगीचच मनाला चाटून जातं. मग एकच पटत ते म्हणजे 'परमेश्वर हा एकच आहे, एकाच धर्माचा एकाच जातीचा तो अनंत आहे. निराकार आहे.' फक्त त्याची रूप, नावं वेगवेगळी आहेत. तुम्ही आम्ही संकुचित मनान ठेवलेली........

'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो अपुले
साधू तोचि जाणावा, देव तोचि ओळखावा'

ह्या तुकाराम महाराजांच्या शब्दातच परमेश्वरावतारी श्रीसाईबाबांच्या धर्माचं रहस्य दडलेले आहे. 'बाबांनी स्वतः आपल्या आचरणानीं, उपदेशांनी त्यांच्या भजनी लागणाऱ्या रागलोभानी त्यांच्या जवळ येणाऱ्यांना त्यांनी अनुभूती देऊन प्रचितीं देऊन हेच सांगितलेले आहे की 'दुसऱ्यांच्या सुखदुःखात आपण आपले सुखदुःख पहाणे. ज्या लोकामध्ये आपण राहतो, वावरतो त्या लोकांचे सुख पाहून आनंदी होणे आणि यांना दुःखी पाहून व्याकुळ होणे व ते दुःख निवारण्यासाठी झटणे हाच खरा परम धर्म आहे.' भागवत धर्मात देखील हेच नमूद केले आहे; की 'यो लोक-शोक हर्षाभ्यामू आत्मा खिद्यति हर्षति' म्हणजे जो लोकांच्या दुःखाने व्याकुळ होतो व त्यांच्या आनंदाने हर्षित होतो तोच खरा भक्त होय. श्रीसाईबाबांचा धर्म 'मानव धर्म' होता, खराखुरा ईश्वरीधर्म ! त्यांच्यांच शब्दात म्हणायचे तर 'परहित व लोककल्याणाची भावना ज्यामध्ये आहे तोच खरा धर्म' म्हणूनच त्यांनी कधीच कुठल्या धर्माचे प्रस्थ माजविले नाही की कुणाला माजवून दिले नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणे वागण्यास सांगितले. मुल्लाला कुराण पठण करायला सांगितले तर ब्राह्मणाला 'गीता' वाचायचा हुकूम दिला. तरी देखील भागवतात सांगितल्याप्रमाणे 'समत्वमाराधन तस्य' म्हणजे समत्व, समानता हीच परमेश्वराची सर्वात मोठी आराधना आहे हे सर्वांना पटवून दिले; दाखवून दिले. 'भुकेल्या श्वानाला घातलेल्या भाकरीने स्वतःची भूक शमली' असे सांगून 'हा साईभगवंत प्राणीमात्रांतही भरून उरला आहे' हे पटवून दिले त्यांच्या भक्तांना !

'धर्म' हे मानवकल्याणाचे एकमेव साधन आहे ती एक आचरणाची बाब आहे हेच आपणास साईचरीत्रावरुन दिसून येते.

फार प्राचीन काळी महाभारतात जे सांगितलं होतं की,

'श्रूयतां धर्म सर्वस्वं, श्रुत्वा चैवावधार्यताम् ।
आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत ॥'

तेच श्री साईबाबांनी सांगितलेले आहे की ' जे काही तुम्ही स्वतःसाठी हानिकारक आणि दुःखदायक समजता ते दुसऱ्यासाठी करू नका. तसं दुसऱ्याशी वागू नका. ' तीच तर बाबांची शिकवण होती. तेच त्यांच्या धर्मांचे अधिष्ठान होतं.

' अनर्थेभ्या न शक्नोती सतु धर्मो निरर्थकः ' म्हणजे जो धर्म अनर्थापासून मानवाचं रक्षण करू शकत नाही तो धर्म अगदीच निरर्थक आहे असं वाल्मीकीऋषिनी लिहिल्याप्रमाणे बाबांनीदेखील आपल्या भक्तांना, अनुयायांना धर्मनिरपेक्ष भक्तीमार्गाचाच अवलंब करायला शिकवलं. परमेश्वर एक आहे हे आपल्या ' सबका मालिक एक ' ह्या शब्दात पटविलं. ' अल्ला तेरा भला करेगा ' ह्या बोलीभाषेत समजावलं आणि फक्त दोनच शब्दात गुरुमंत्र दिला ते दोन शब्द म्हणजे ' श्रद्धा आणि सबुरी ! '

आज आपल्या भारत देशाच्या निधर्मीपणाचं प्रदर्शन–जीवंत दर्शन–कुठल्याही क्षणी आपणास शिरडी क्षेत्री पहावयास मिळते. तसेच जेथे जेथे श्रीसाईबाबांचे मठ, मंदिर आहेत तेथे तेथे आढळून येते याचे कारण एकच ते म्हणजे ईश्वरावतारी श्री साईमाऊलीची परमार्थिक परोपकाराची, भूतदयेची शिकवणूक आणि त्यांनी स्वतः आचरणात आणून इतरांना आचरणात आणावयास शिकविलेला त्यांचा लोककल्याणकारी मानवधर्म !

★

# वैद्यराज उपासनींचे उपासनी महाराज कसे झाले

—श्री. जी. व्ही. उर्फ नानासाहेब जोशी
चिटणीस श्रीउपासनी कन्याकुमारी आश्रम,
साकोरी, जि. अहमदनगर

● **श्री उपासनी महाराज**–त्या वेळचे वैद्यराज श्री काशिनाथ गोविंद उपासनी हे उमरावती-नागपूर बाजूला नामांकित वैद्य होते. वऱ्हाडचे नवाब श्रीमान दादासाहेब खापर्डे यांच्याची त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा व आपुलकीचा संबंध होता मृत्युपूर्वी खापर्डेसाहेब साकुरीस एकदीड महिना येऊन राहिले होते. त्यांचे तैनात व्यवस्था पहाण्यास श्री उपासनी महाराजांनी हल्ली अहमदनगरला राहात असलेले प्रसिद्ध डॉ. जी. जी. सहस्रबुद्धे यांची योजना केली होती खापर्डे साहेबांचे सल्ल्याने वैद्यराज यांनी 'भेषजरत्नमाला' या नावाने मासिकहि काही वर्षे चालू केले होते. लहानपणापासूनच वैद्यराजाना योगाभ्यासाची आवड होती आता या शास्त्रात चांगलीच प्रगती केली होती. पुढे नेति, धौति, कुंभक, रेचन, प्राणायाम शीर्षासनादि आसने यात त्यांचा बराच वेळ जाऊ लागला या योग साधना क्रियेत कोठेतरी कमी अधिक होऊन त्यांना एकाएकी अनियमित श्वासोच्छवासाची व्यथा जडली. हातपायाचे चलनवलन पोटदाबणे या कृत्रिम उपायानी त्यांचे श्वसन पूर्ववत आणावे लागत असे. केव्हा केव्हा प्राणांतिक अवस्था होई. शेवटी कंटाळून दवाखाना, मासिक यांची विल्हेवाट लावून सर्व पसाऱ्यांची आवरा आवर करून पत्नीसह ते इ. स. १९१० चे सुमारास धुळयास आले.

त्यांचे बंधू महामहोपाध्याय बाळकृष्ण गोविंद उपासनी हे धुळे येथील ट्रेनिंग कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक होते. त्यांचे बिऱ्हाड लालबागेत त्रिविक्रम मंदिराचे माडीवर होते. घरात मातोश्री, पत्नी, मेहुणा अनंत, वैद्यराजांचा मेहुणा नारायण, पुतण्या पुरुषोत्तम, लेखक व आणिक एक दोन मिळून आम्ही पाच सात मुले त्यांच्याकडे शिक्षणास राहिलो होतो. वैद्यराज पत्नीसह धुळयास आल्यावर त्यांची व्याधी निवारणार्थ अनेक उपचार सुरू झाले. धुळयाचे त्या वेळचे सिव्हिल सर्जन डॉ. धारपुरे यांनीहि प्रकृति तपासली व 'आमच्या डॉक्टरी शास्त्रात ही व्याधी कोठे बसत नाही. तुम्ही यांना चांगल्या योग शास्त्र तज्ञास दाखवा' असा निर्णय दिला. काही दिवस हवा पालट करण्याच्या दृष्टीने तयारी सुरू झाली. पत्नी दुर्गाबाईस माहेरी सोनगडला

पोहोचते केले. जरूर ते सामान, कानाला वारा लागू नये म्हणून टापर्शप्रमाणे फेटा रुमाल मस्तकास चांगला व्यवस्थेशीर गुंडाळला. वुलनचा लांब कोट, पायमोजे, बूट हातात मूठ असलेली काठी व दोन मुले पुतण्या गजानन व भाचा श्रीकृष्ण ही बरोबर घेतली. रेल्वेने प्रवासास निघाले चाळीसगाव स्टेशनवर उतरल्यानंत राहुरीला कोर्टात नोकरी करणारे कुळकर्णी नावाचे चांगले योगी आहेत असे कळले. दोघा मुलाना परत धुळयास पाठवून आपण एकटेच राहुरीस आले.

योगी कुळकर्णी राहुरी गावाजवळ एका मळयात राहात असत. घराचा पुढील भाग ओसरीप्रमाणे कोर्टाच्या व इतर कामास येणाऱ्या लोकांस भेटण्यासाठी राखून ठेवला होता. या घराचे मागच्या बाजूस जरा अंतरावर अलग उंच झाडाची आच्छादिलेली एक खोली योगाभ्यासासाठी मुद्दाम तयार करून घेतली होती. आत अत्यंत निरामय शांतता स्वच्छ प्रकाश होता. अनेक योगी व साधुसंतांची छायाचित्रे व आसनांदीचे तक्ते भिंतीस व्यवस्थेशीर लावले होते. याच खोलीत वैद्यराजांना दोन दिवस ठेवून घेतले. कोर्टाच्या कामातून मोकळे होताच पाहुण्यांनी प्रत्येक अवयवाची त्यांच्या शास्त्रीय दृष्टीने तपासणी केली व म्हणाले, ‘तुमची अवस्था फार उच्च प्रतीची झाली आहे. त्या मानाने मी तर खालच्या पातळीवर आहे.’ यावर वैद्यराज म्हणतात, ‘अहो कसली उच्च अवस्था सांगता मला. यातले काही कळत नाही मला. मी या व्याधीने पीडलो आहे. केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. विनाकारण स्तुति करू नका.’ कुळकर्णी उत्तर देतात, ‘मी कोणाची परमेश्वराखेरीज स्तुती करीत नसतो. योगशास्त्राच्या दृष्टीने तुमची प्रकृति पाहून जे मला समजले तेच सांगितले. मी या शास्त्राच्या पहिल्या पायरीवर आहे. परंतु हे ध्यानात ठेवा की या व्याधीतून तुम्ही पूर्णपणे मुक्त व्हाल. तुमच्या हातून मोठमोठी कार्ये होतील. याबरोबर हेही सांगतो की तुमची ही व्याधी नाहीशी करणारी एकच व्यक्ती आहे. ती म्हणजे शिर्डीचे साईबाबा झाले! साईबाबांचे नाव ऐकताच वैद्यराज एकदम उसळले, ‘काय! मारुति, राम, देवी, गणेश असे महान तेहत्तीस कोटी देव असून तुम्ही मला त्या मुसलमानाकडे जाण्यास सांगता! इंग्रजांच्या नोकरीने तुम्हा लोकांची मति भ्रष्ट झाली आहे. सनातन धर्मावरील निष्ठा लोप पावू लागली. काय सांगावे. तुम्ही योगी आहात. मी येथे एक क्षणभर थांबत नाही. त्या म्लेंछाकडे मी कधीच जाणार नाही असे तावातावाने बोलून योगीराजांचे घर सोडले व राहुरीहि सोडली.

राहुरीहून पुढे ते मोरगांवला फाटक नावाचे योगी असल्याचे समजल्यावरून तिकडे गेले, परंतु फाटक महाराज काही दिवसांचे मुदतीचे अनुष्ठानात असल्याने भेट झाली नाही. पुढे केडगावी नारायण महाराजांकडे ते जाण्यास निघाले. रस्त्यात एक चमत्कार घडला.

बरेच अंतर पायीच चालावे लागल्यानंतर एक स्वच्छ पाण्याचा झुळझुळ वहाणारा ओढा लागला. श्रम परिहारार्थ हातपाय धुवून पाणी प्राशन करणार, तोच एक म्हातारी बाई त्यांच्या जवळ येऊन म्हणते, 'अरे बाबा, थंड पाणी पिऊ नकोस. पलीकडे जवळच गाव आहे. ब्राह्मणाचे घरी ऊन पाणी करून पी. बरे वाटेल.' त्या म्हातारीच्या शद्बाने अंतःकरणाचा ठाव घेतला. तहान हरपली. आतून एक प्रकारची हुषारी वाटू लागली. त्या नादात ओढा पार केला. म्हातारीचे स्मरण होऊन पैलतीरी मागे बघतात तर ती अदृश्य. तिने सांगितल्याप्रमाणे गाव लागले. गावात ब्राह्मणाचे घर शोधले. तेथील एका वृद्ध साध्वीने ऊन पाणी करून दिले. ते प्राशन करताच त्यांना ग्लानी आली. त्या साध्वीने दिलेल्या सतरंजीवर वैद्यराज पहुडले. पुढे शिर्डीच्या वास्तव्यात साईबाबांनी या प्रसंगाचे स्मरण वैद्यराजांना करून दिले व म्हणाले, 'अरे, बाबा थंड पाणी पिऊ नकोस. गावात जाऊन बामणाचे घरी गरम पाणी पी–' असे सांगणारी म्हातारी मीच होतो नव्हे का?' यावर 'अस्स होय. मला काय कल्पना आपली लीला अगाध आहे.' असे म्हणून त्यांनी बाबांना साष्टांग नमस्कार घातला.

थोडी विश्रांती घेतल्यानंतर त्या वृद्ध साध्वीने भक्तीभावाने वाढलेले अन्न खाऊन गरम पाणी घेतले. तेव्हा पासून ते गरम पाणी प्राशन करू लागले. तेथून केडगावी नारायण महाराजांकडे गेले असताना महाराजांनी एक विडा खाण्यास दिला. तो खाऊन नमस्कार करून हात जोडून उभे राहिले. महाराज म्हणतात, वा आतून बाहेरून छान रंगलास व केडगावाहून अहमदनगरला गेले असता तसे एक अवलिया भेटले ते मोठ्याने हातवारे करीत, 'तुम कहीभी जा सकते हो उदर जाव उदर जाव सब जगा जाव और अस्मान आपकु खुला है—'

नगरहून परत येताना पुन्हा राहुरीस आले. श्री कुलकर्णी महाराजांना प्रवासातील सर्व घटना निवेदन केल्या. सद्यस्थितीवर थोडी चर्चाहि झाली. आता आपण सांगता म्हणून शिर्डीस जाऊन बघतो. असे सांगून शिर्डीस आले. त्यावेळी दुपारची आरती चालू होती. आरती नंतर तीर्थ वाटण्यात आले. ते वैद्यराजांनी कोणास न कळत खाली मागचे बाजूस टाकून दिले. बापूसाहेब जोग व दीक्षित यांचे समवेत दीक्षित वाड्यात भोजन केले, व जाण्याची तयारी केली. जाताना साईबाबांची परवानगी घ्यावी लागते असा इथला दंडक आहे असे त्याना सांगण्यात आले.

त्याप्रमाणे त्या दोघांबरोबर मशिदीत आले. जोगांनी, 'हे उपासनी सकाळी आले. ते जायचे म्हणतात तरी त्यांना निरोप द्यावा' अशी विनंति केल्यावरून साईबाबा हसून म्हणतात, 'होय होय त्याला चांगला पाहिला. त्याने देवाच तीर्थ टाकून

दिले पन देव त्याला टाकणार नाय त्याला म्हणाव येथेच रहा. कशाला जातोस ' यावर वैद्य राजांना धीर येऊन, ' बाबा मी आज दीड-दोन महिने झाले बाहेर हिंडत आहे. घरचे लोक फार काळजीत असतील तरी मला जाऊ द्या ' अशी विनंति केली. यावर साईबाबांनी बरं जातोस ! तर जा जाशील कुट येशील आठ दिवसानी असे म्हणताच ' जातोस तर जा ' या तीन शब्दांची पडत्या फळाची आज्ञा समजून द्वारकामाईतून चटकन निघून शिर्डीही वैद्यराजांनी सोडली.

महान योगी चांगदेव यांचे समाधीस्थान पुणतांबे येथून जवळच असल्याने वैद्यराज तिकडे गेले तेथे गोदावरीचे स्नान, चांगदेव समाधीपूजा ध्यान धारणा इतर देवस्थाने पहाणे तीर्थ श्राद्धयात दोन दिवस गेले. तेथून कोपरगावी कोणी ब्रह्मचारी बुवा होते त्यांचेकडे गेले. तेथे गावाबाहेरील खंडोबाचे देवळात वस्ती करून रोज माध्यान्हीला ब्रह्मचारी बुवांकडे येत. पेशव्यांचा वाडा, बेटातील शुक्रेश्वर कचेश्वर देवस्थाने विष्णु मंदीर, पश्चिम वाहिनी संजीवनी पार इत्यादी पहाण्यात दोन तीन दिवस गेले. सरदार विंचूरकर बेटातील देवस्थानांचे सरपंच असल्याने तेथील व्यवस्था बघण्यास मधून मधून येत असत. याहि वेळी ते आले असताना त्यांनी शिर्डीस जाण्याचा विचार केला व ब्रह्मचारी बुवाकडे येऊन त्यांना, ' आपण आमचे बरोबर शिर्डीस यावे अशी विनंती केली. बुवांचे काही अनुष्ठान चालू असल्याने त्यांना सीमोल्लंघन करायचे नव्हते तथापी आपल्याबरोबर एक चांगला माहितगार देतो, उदईक सकाळी जाण्याचे ठरवावे असे बुवांनी विंचुरकरांना सांगितले. नेहमी प्रमाणे मध्यान्हीला वैद्यराज ब्रह्मचारींकडे आले. त्यांना, अहो उपासनी, सरदार विंचूरकर आले आहेत त्यांना शिर्डीस जायचे आहे. मला तूर्त अनुष्ठानाचेस्थळ सोडता येत नाही. तरी आपण त्यांचे बरोबर जावे असे वाटते. नाही म्हणू नका ही मोठी माणसे आहेत. उदईक सकाळी निघायचे आहे. असे बुवांनी सांगितले उपासनींना मोठा पेच पडला. त्याना शिर्डीस पुन्हा जायचे नव्हते. दोन तीन दिवस ब्रह्मचारींकडे अन्न खाल्ले. नाही कसे म्हणावे होकार द्यावा लागला, '-परंतु माझी एक अट आहे. मी गावात जाणार नाही. ज्या टांग्यातून आम्ही जाऊ त्याच टांग्यातून मी माघारा येईन. सरदार सडकेवर उतरतील. त्यांना गावात जाण्याची वाट दाखवीन पुष्कळ मोठी माणसे दर्शनास जाणारी सडकेवरच भेटतील, व यावर ब्रह्मचारी बुवांनी काही हरकत नाही. आपण जरूर माघारी या असे म्हणून मनात ' तुम्ही तेथे जा नंतरचे साईबाबा काय ते बघून घेतील ' अशी अटकळ केली.

दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे टांगा तयार झाला. विंचूरकर पुढील भागी सरदारी इतमानाने विराजमान झाले. मागले बाजूस त्यांचा पटेवाला व उपासनी बसले. ब्रह्म-

चारी बुवानी ' शुभास्ते पंथानः ' म्हणून सर्वांचे कुशल चिंतिले. टांगा मजल दरमजल करीत शिर्डीस आला. लेंडीबागेजवळ सडकेवर थांबला बडे पाहुणे उतरले. त्यांना वाट दाखविण्यास गावाचे बाजूने दोनचार पाऊले उपासनी जातात. तोच लेंडीबागेच्या बाजूने साईबाबा येऊन म्हणाले, ' अरे आलास व्हय आजचा कितवा दिवस ? ' उपासनी-आज बुधवार आठवा दिवस साईबाबा,-आठव्या दिवशीच परत आलास ना ? मग आता कुठ जाशील ? '

साईबाबांच्या ' आता कुठे जाशील ? ' या तीन शब्दांची जबरदस्त मोहनी उपासनींवर पडली. तिने त्यांना शिर्डीस चार वर्षे डांबून ठेवले. वैद्यराजांचा राजेशाही पोषाख घालवून तरट पांघरायला दिले, आणि लोक कल्याणार्थ त्यांना श्री उपासनी महाराज बनविले.

इकडे धुळ्यास काशिनाथ ८-१५ दिवस हवापालट करून येतो म्हणून गेला आज चार महिने झाले तरी आला नाही सर्वांना काळजी वाटू लागली. ' त्याला एकांत वासाची आवड आहे. महिने-महिने अनुष्ठानास बसण्याची सवय आहे येईल. ' याहि विचारात दोन-चार महिन्याचा अधिक काळ गेला तरी ' आला नाही ' आता मात्र शोधाशोध सुरू झाली. अनेक पत्रे पाठविली सवडीने माणसेही जाऊन आली. शेवटी तब्बल सव्वा वर्षाने त्यांचे स्वतः लिहिलेले जाडसे पाकीट आले. त्यात आरंभी दोन महिन्याच्या भ्रमंतीचे निवेदन होते नंतर-' मी शिर्डीस एक वर्ष आहे साईबाबा महान अवलिया आहेत. त्यांनी मला येथे चार वर्षेपर्यंत ठेवून घेतले आहे. कोठे जाऊ देत नाहीत. तुम्हा सर्वांची फार आठवण येते. तुम्ही काळजी करीत असाल तुम्हास भेटण्याची प्रबळ इच्छा आहे. तरी प्रथम कोणीतरी वरित यावे. पुष्कळ सांगा-बोलायचे आहे. तसा मी आनंदात आहे. काळजीसारखे नाही. माझा शिर्डीस खंडोबाचे देवालयात तपास करावा-अगदी शेवटी मनमाडहून शिर्डीस येणाऱ्या सर्व्हिस मोटारींच्या वेळा-भाडे-वाटेवर लागणारी गावे अशी त्यांनी संपूर्ण माहिती दिली होती.

काशीनाथाचा शोध लागला. आनंदी आनंद झाला. मातोश्रींनी खडीसाखर वाटून येणाराजाणारीची तोंडे गोड केली. यापुढे शिर्डीस जाण्याबाबत चर्चा सुरू झाली. रोज रात्री मातोश्रींचे अंथरुणाजवळ मोठी माणसे बसून विचारविनिमय होई. मी आजींचे जवळ झोपत असे. त्यामुळे सर्व ऐकण्यास मिळे. शिर्डीहून आलेल्या बावांच्या ( काशीनाथ उपासनी वैद्यराजांचे घरगुती टोपण नाव व दादा त्यांचे थोरले बंधूचे नाव ) पत्रातील जरूर जो भाग अनेकवेळा वाचला जाई. दादांना रजा मिळणे

शक्य नव्हते. मुलांबरोबर एकदोघींना पाठवावे तर पावसाळा सुरू झाला होता. शिवाय प्रथमच स्त्रियांनी जाणे योग्य वाटेना. दिवाळीत दादांना शृंगेरी मठ शंकराचार्यांकडे जरूरीच्या कामासाठी जाणे निश्चित झाले होते. शेवटी दिवाळी सुटीनंतर चार दिवसांची रजा काढून दादांनीच जायचे ठरले. मी मात्र या सर्वांचे अगोदर आपण बाबांना भेटून यायचे असे मनात निश्चित ठरविले. त्या दृष्टीने बाबांनी लिहिलेली शिर्डीस जाण्यासंबंधी माहिती लक्षपूर्वक अनेकवेळा ऐकली व संधी शोधू लागलो. दिवाळीचे सुटीत सर्व मुले आपआपल्या घरी गेली. मीही दाभाडीस (मालेगावाजवळच) घरी आलो. तेथे माझे थोरले चुलत बंधू बाळकृष्ण सोपान जोशी यांनी त्याच्या काही शिक्षकासमवेत अनकाईची सहल काढली. संधी सापडली. परंतु मी लहान अन-काईच्या डोंगरावरीस सात दरवाजे चढून जाणे मला अशक्य. त्या लोकांनी मला बरोबर नेण्याचे नाकारले. अरे तो मनमाडला तुमचे सामान सांभाळील. आगगाडीची गम्मत पाहील असे आईने सांगितल्यावरून त्यांनी कबूल केले. आम्ही दाभाडी–मालेगावला मनमाडला संध्याकाळी ४–५ चे सुमारास पोहोचलो. स्टेशनजवळील धर्मशाळेत एक खोली भाड्याने घेतली. सामान ठेवले. आम्ही अनकाईला जाण्यासाठी बैलगाडी ठरवून येतो. तू येथे सामानाकडे बघ. तुला खाऊ आणू असें सांगून ते गावात गेले. ते दूर गेलेले बघताच खोलीस कुलूप लावून जवळच मनमाड–नगर मोटार सर्व्हिसचे ऑफिस होते तेथे जाऊन शिर्डीस जाणाऱ्या येणाऱ्या गाडींची चौकशी केली व खोलीत येऊन बसलो. भाड्याने ठरवलेली बैलगाडी दुसरे दिवशी पहाटेस आली. तिच्यातून ही मंडळी आनकाईला निघाली. जाताना– ही कुलूपकिल्ली घे. सामान नीट सांभाळ. स्टेशनवर जाताना कुलूप लाव किल्ली सांभाळ आम्ही संध्याकाळी येतो व उद्या सकाळी आपण घरी जाऊ स्टेशनवर चुकू नकोस तसा तू हुशार आहेस हे चार आणे खाऊला घे आम्ही तुला पेढे खोबरे वगैरे आणू असे सांगून बैलगाडी रस्त्याला लागली. आईने दिलेला चिवडा-लाडू खाऊन सर्व सामान खोलीत ठेवले. कुलुप लावून मोटार ऑफिसकडे आलो. शिर्डीचे मज जवळून तीन आणे भाडे घेतले. शिर्डीस १० चे सुमारास पोहोचलो.

लहानपणी मराठ्यांच्या ऐतिहासिक पराक्रमांमुळे मन स्वाभिमानाने भारावले होते. कोणत्याही गावी गेलो तर तेथे किल्ला, गढी, वाडा, विहिर निदान वेस यापैकी जे असेल ते पाहाण्याचा नाद असे. तपासांती वेस असल्याचे समजले. वेसेतून गावात प्रवेश करावा व तेथून खंडोबाचे देवळाचा तपास करुन जावे असे ठरविले. त्याप्रमाणे वेस पाच-दहा मिनिटे दारांसह न्याहाळली. मनोमन पूर्वजांचे स्मृतीस वंदन करून वेसेतून दक्षिणाभिमुखाने गावात शिरलो तोच पूर्वपश्चिम जाणारी सडक लागली. ती पश्चिमेकडून गावाबाहेर जात असावी असा अंदाज केला. त्याप्रमाणे पाच सात पावले

गेलो आणि उत्तर कडेच्या बाजूला एक मशीद लागली. मशीदी भोवती या बाजूने चार पाच फूट उंचीची भिंत होती. तिच्यातून चार पाच फूट रुंद असा आत जाण्याचा मार्ग होता. मार्गाचे दोन्ही बाजूस भिंतीला दगडी खांब होते. पश्चिमेकडील खांबाला उजव्या हाताचे कोपर टेकून तळहातावर मस्तक रेलून एक फकीर उभा होता. तो जणू कोणाची मार्ग प्रतीक्षा करीत असावा. तो बघताच 'साले हे लांडे जेथे तेथे तरफडतात' अशी मनात शिवी हासडून त्याचे पासून अधिक दूर होण्यास थोडे वळण घेऊन सडकेच्या दक्षिणेकडील कडाने जाऊ लागलो. जाताना एक तिरस्काराचा कटाक्ष टाकला झाले! दृष्टादृष्ट झाली. त्याने डाव्या हाताने मला बोलावले. मी घाबरलो वर ऑक्टोबर हीट तळपत होती. आता हा मला मशीदीत नेणार–ठोकणार–मारणार सुंताहि करील–परंतु हा वडील माणूस आहे–त्याचे ऐकले पाहिजे–बघु या काय करतो ते तसाच काही प्रसंग आला तर आरडा–ओरडा करून पळून जाऊ–असे क्षणा क्षणात एक एक विचार मनात येत गेले आणि माझी पाऊले त्याचे दिशेने अभावित पणे पडत गेली. तोहि दोन पाऊले माझ्याकडे सरकला आणि माझे मस्तक आपल्या दोन्ही हातानी हळूवार धरुन आपल्या जुळलेल्या पावलांवर टेकविले मला एकदम थंड शांत वाटले त्या सुखद अलौकिक स्पर्शाने माझे देहभान हरपले. त्यानेच मला पाठीवर थोपटून उठविले. मी थबथबत्या डोळयानी हात जोडून त्याचे समोर उभा ठाकलो. काय बोलावे सुचेना, त्याचेही डोळे पाणावले ते उजव्या हाताने पुसून डाव्या हाताने माझ्या उजव्या हाताची तर्जनी धरुन सडकेवरून मशीदीच्या हद्दी पर्यंत सावकाश चालविले. तेथे थांबून डावा हात माझ्या मस्तक पाठीवरून फिरविला व उजव्या हाताने माझे तोंड कुरवाळले असाच सरळ पुढे जाण्यास खुणावले. मी आनंदातिशयात भराभर पावले टाकीत दुकान मागे टाकले. पुढे उतार लागला. मागे वळून पाहतो तो फकीर बाबा तेथेच उभा होता. मी उतारावरून नमस्कार केला. त्यानेहि त्याच उतारावरून पुढे जाण्यास खुणावले. मी धावत उतारावरून सडके जवळ आलो. थोडे दक्षिणेच्या बाजूला सडके पलीकडे एक पडकेसे देऊळ दिसले. त्या देवळाचे जवळ उत्तरेस असलेल्या झाडा खाली दोघेजण उघड्या आंगाने स्वयंपाक करीत असलेले पाहिले मी त्या दिशेने सडक पार झालो आणि त्या दोघात बाबांना ओळखले. धावत जाऊन बाबा बाबा करीत त्यांचे गळयत पडलो. त्यांनीही पाठीच्या खरकट्या हातानीं मला पोटाशी धरले. माझा...बाळ...तू...एकटा स्फुंदून स्फुंदून म्हणू लागले.

भावनावेग ओसरल्यावर मी बाजूला होऊन जवळ बसलो. हवा पालटण्यास गेल्यापासून त्यांचे पत्र येईपर्यंत सर्व सांगत होतो. 'काशीनाथाचा शोध लागला' म्हणून आजीने खडीसाखर वाटल्याचे सांगताच 'माझी आई' म्हणून डोळे पुसले, रात्री आम्हाजवळ पत्राचे वाचन इकडे आपल्या भेटीला येण्याचे बेत, दिवाळी सुटी,

दाभाडीहून मी शिर्डीस कसा आलो. फकीराची भेट—सर्व भराभर सांगितले. इकडे स्वयंपाक चालूच होता. नंतर बाबांनी घरातील सर्वांची नावनीशीवार खुशाली विचारली. स्वयंपाक होताच नैवेद्य वाटला गेला. दुसरे गृहस्थ दीक्षित गुरुजींनी नैवेद्य हातात घेऊन 'साईबाबांना नैवेद्य नेतो' म्हणून शिर्डीगावाकडे गेले. मी उत्कंठतेने 'साईबाबा म्हणजे तो फकीर काहो!' असे बाबांना विचारले, अरे हो तेच ते साईबाबा. तुला एक गुपीत सांगतो. अरे साईबाबा म्हणजे आपले बापूच (बाबांचे आजोबा गोपाळ शास्त्री) तुझा त्यावेळी जन्मही नव्हता. परंतु ऐकून ठाऊक असेल की बाबांना शेवटी अर्धांगवायु झाला होता. साईबाबांचे बघ डावा हात व डावा डोळा थोडे कमकुवत आहेत असे रक्ताचे नाते आहे म्हणूनच ते माझ्या इतके मागे लागले व आपला सर्वांचा त्यांना आपुलकीचा जिव्हाळा. लौकिक दृष्टीने ते कोण आपण कोण! ना जातीचे ना पातीचे.'

या संदर्भात अनुलक्षून एक दोन वर्षांनी जी घटना घडली. ती देत आहे. उपासनी महाराजांच्या चरित्रातून ही सविस्तर आलेली आहे. श्री साईबाबांनी वैद्यराज उपासनींना चार वर्षे राहाण्यास सांगितले होते या काळात शिर्डी सोडून कोठे जायचे नाही असाहि संकेत होता. या काळातील निम्माकाळ म्हणजे उपासनींची शिर्डीतील तपश्चर्येची दोन वर्षे संपली होती. एक दिवस दुपारी बरेच लोक साईबाबांकडे बसले असता खंडोबाचे देवळातील उपासनींचा विषय निघाला.

कोणी सांगू लागले. तो दगड मारतो, शिव्या देतो. यावर एकाने उत्तर दिले त्याच्या मारण्याने माझे दुखणे गेले शिव्यानी हित झाले. असे चांगले वाईट, उलट सुलट बोलू लागले. हे ऐकून साईबाबा सर्वांना गप्प बसवून म्हणाले, त्याचेबाबत काय सांगतो ते ऐकून ठेवा, तो माझा आहे. त्याला मी माझे सर्वस्वी देऊन टाकणार आहे. तो एकीकडे व सर्वजण एकीकडे असे त्याला बनविणार आहे. 'यावर लोक म्हणू लागले, बाबा, आम्ही तुमची इतकी वर्षे सेवा केली. तो काल परवा आला. कोठला—कोण! त्याला सर्वस्व देणार याचा अर्थ काय! यावर साईबाबा मोठ्या आवाजात म्हणतात, 'अरे त्याचे माझे कित्येक जन्माचे संबंध आहेत मी जे बोलतो ते बोलतो ते खोटे नाही. अरे ही मशीद खोट्याची आहे काय! मी बोलतो ते ताम्रपटावर काय सोन्याच्या पटावर लिहून देईन....'

ऑल इंडिया साई समाजाचे आद्य प्रवर्तक श्री बी. व्ही. नरसिंहस्वामी यांनी साईबाबांचे इंग्रजी चरित्र लिहिले त्याच प्रमाणे सेज ऑफ साकुरी नावाचे श्रीउपासनी महाराजांचे चरित्र लिहिले. या गृहस्थाची धडाडी व प्रचंड उद्योग असा की, त्यांनी

दोन वर्षे साकुरी वास्तव्य केले. आमच्या सारख्यांकडून मराठी शिकले. मराठीतील उपासनी लीलामृत हे चरित्र इतर वाङ्मय, इंग्रजीतील त्यांच्या संबंधी श्री दादासाहेब खापर्डे व इतरांनी लिहिले या सर्वांचा सखोल अभ्यास. इतकेच नव्हे तर उपासनींचे जन्मस्थळ सटाणे, आजोळ मुल्हेर, कार्यस्थळे उमरावती, धुळे राहुरी ही प्रत्यक्ष पाहून माहिती मिळवून नंतरच 'सेज ऑफ साकुरी' लिहिले.

साईबाबांना नैवेद्य दाखवून गुरुजी परतांना दिसले. बाबांनी बोलणे थांबवले मी परत जाण्याची घाई करू लागलो. बाबा—गुरुजी आलेच आता जेवायला बसूच गुरुजींनी येताना मजकरिता एक लहान ताट, गूळ व दूध आणले. जेवताना बाबांनी विनोदही केला. आमचा पुरुषोत्तम लहानपणी देवी आल्याने एका डोळयात फूल पडले होते. परंतु अभ्यासात हुषार व व्यायामाची आवड त्याला उद्देशून तो चकन्या पहिलवान काय म्हणतो ! आमची एक जवळीक नातलग बाई श्रीमंत थोडी स्थूल, चटपटी व रंगाने थोडी काळी 'ती काळी घूस आली होती का ?' आमची आजी चुली जवळ भाकरी भाजून तेथून न उठता आम्हा सात–आठ मुलाच्या ताटात प्रत्येकाला चतकोर चतकोर भाकरी भिरकावून ती नेमकी ताटात पडत असे. ती नक्कल गुरुजींच्या ताटात भाकरी टाकून करून दाखविली. अशा हास्य विनोदात जेवण संपले. मी जाण्यास निघालो. सर्वांना नमस्कार केला. तेवढ्यात एक बाई एक गाठोडे घेऊन बाबांपुढे ठेवीत या पोराला साईबाबांनी दिलय असे म्हणून निघून गेली. गुरुजींनी गाठोडे सोडले. एक हिरवी जरीची टोपी, सदरा व लहानसे धोतर व पेढ्याचा पुडा निघाला. पाहिलस, साईबाबांचा आपल्याबर किती जीव आहे असे म्हणून बाबांनी माझे जुने कपडे काढून नवे घालायला लावले मी खंडोबा, बाबा व गुरुजींना दोन दोन पेढे देऊन नमस्कार केला. बाबांनी एक पेढा माझे तोंडात घातला गहीवरून आंगावरून प्रेमाने हात फिरवला 'सांभाळून जा, लहानसा पोर कसा एकटा आला पहा ! सर्वांना मी खुशाल आहे सांग, दादांना पाठीव' असे म्हणत पाच सात पाऊले मला पोहोचविले. गुरुजी व मी लेंडी-बागेजवळ सडकेवर थांबलो. 'येथेच मी सकाळी मोटारीतून उतरुन असा वेशीकडे गेलो' असे दाखवीत असताना नगरच्या बाजूने मोटार आली, व मी पाचच्या सुमारास मनमाडला पोहचलो. त्वरीत कुलूप उघडून नवीन कपडे एका फडक्यात गुंडाळून ठेवले जुने घालून खोलीच्या दाराशी खाऊ खात बसलो दिवसभरात घडलेली सर्व हकीकत आईला सांगण्यास मनात जुळवत होतो.

अनकाईहून ती मंडळी दिवे लागणीचे सुमारास परत आली. मला शाबासकी देऊन प्रसाद-खाऊ दिला. मी काही एक न सांगता बोलता दुसरे दिवशी सकाळी ११

चे सुमारास आम्ही घरी आलो. आईला नमस्कार करून 'बघ मी बाबांना भेटून आलो' असे म्हणून कपडे दाखविले. सर्वांना फार आश्चर्य वाटले. माझे खूप कौतुक होऊ लागले. आजीला तर बाबा भेटल्याचा आनंद झाला.

दिवाळीनंतर ठरल्याप्रमाणे सवडीने चार दिवसांची रजा घेऊन दादा शिर्डीस बाबांना भेटण्यास गेले. ते साल इ. स. १९१२ होते.

# भक्तपदवी व शिष्यपदवी

—श्री. चकोर आजगांवकर एम्. ए.
(अंडर सेक्रेटरी, वित्त, महाराष्ट्र)
वाय ११/१७० सरकारी वसाहत, वांद्रे
(पूर्व) मुंबई ५१

● श्रीबाबांना भजणारे बरेच भक्त '**बाबा आमचे गुरु आहेत**' असे सांगतात. परंतु '**गुरु**' या शब्दाची वा शिष्यत्वाच्या संबंधाची त्यांना नीट कल्पना नसते. कारण वाच्यार्थाने पाहिले, तर बाबांचा कुणीहि शिष्य नव्हता; इतकेच नव्हे तर बाबांनी कुणालाहि गुरुदीक्षा दिली नव्हती. बाबापाशी येणारे आर्त, अर्थार्थी भक्तच अधिक होते. त्यांचे नाते व्यावहारिक अडचणी व गरजामधून निर्माण झालेले होते. बाबांनी पापी, पुण्यवान्, पतित, भलाबुरा असा प्रपंच कधी केला नाही. अक्कलकोट-स्वामी हे त्यांचे मोक्षगुरु त्यांच्यासारखे माणसाला पारखून कसोटीला लावून मग जवळ करणारे अवधूत पुरुष व अवलिया बाबा यात मोठा फरक होता. बाबांनी आपल्या कृपेचे दान सर्वांना मुक्त हस्ते केले. ते देण्यासाठीच आले होते! आपल्या तपस्येचे व सिद्धीचे फळ त्यांनी भल्याबुऱ्याना लहान थोरांना सारख्याच मापाने दिले! त्यामुळेच त्यांचा कुणी शिष्य होऊ शकला नाही. सारे त्यांचे भक्त होते. आमच्या उणीवा त्यांनी जशाच्या तशास्वीकारल्या होत्या. त्यांचे शिष्य बनावयास आम्हामध्ये अंतर्बाह्य बदल व उच्च स्तराची प्रगती व्हावयास हवी! आम्ही सर्वसाधारण भक्त त्यांच्याकडे संकटात काही मागावयास येतो. ते पुरे करण्याचे ब्रीद बाबांनीहि उचलले असल्याने ते आर्त, अर्थार्थी भक्तांची दुःखे व मागण्या पुऱ्या जरूर करतात. कृतकृत्य झालेले भक्त समाधीस नवस फेडतात. नव्या मागण्या करतात. नवे नवस केले जातात. याचक व दाता एवढे नातेच आम्ही जाणतो. त्याच्या पलीकडे जात नाही. आमचे काम पुरे झाले की कंठी गहिवर आणून

आम्ही बाबांचे अद्‌भुत चमत्कार वर्णन करतो. ते अनुभव इतराना सांगतो. भक्ती म्हणजे बाबांकडे नवी नवी गाऱ्हाणी व मागणी सादर करणे आणि व्यवहारातील नियमानी न होणाऱ्या गोष्टी एका अद्‌भुत शक्तीने सुकर करून घेणे, एवढाच आमचा आशय असतो. कृतज्ञतेने आम्ही '**बाबा आमचे परमेश्वर आहेत, गुरु आहेत**' असे म्हणतो व मग सारे विसरून जातो. आमचे क्षुद्र जीवन पूर्वीसारखेच त्रिगुणाच्या चौकटीमधून आणि स्वार्थाच्या किनाऱ्यातून अप्रतिहत वाहत रहाते ही भूमिका, हे संबंध खऱ्या भक्तीचे नव्हेत की गुरुशिष्यत्वाचेहि नव्हेत! यासाठी '**श्रीबाबा आमचे गुरु आहेत**' असे क्षणिक भावनेने म्हणण्यापूर्वी या शब्दाचा व संबंधाचा अर्थ व मर्म नीट समजावून घ्यावयास हवे. नाहीतर ते अर्थशून्य ठरेल.

मला वाटते आम्ही कुणीही खऱ्या अर्थाने बाबांचे '**भक्त**'ही नसतो की '**शिष्य**'ही नसतो. आम्ही केवळ अनंतकाळचे याचक असतो. समर्थाच्या दारी कटोरा घेऊन बसलेले भिकारी असतो. या भूमिकेत बदल, उत्क्रांती वा विकास करून घ्यावयाची आम्हाला जरूरी वाटत नाही. त्यात सर्व आयुष्य सरून जाते. मी वयोवृद्ध झालेले तसेच तरुण वयाचे तथाकथित '**साईभक्त**' व साई दरबारातले संत पाहिलेले आहेत. त्यांच्याकडे मोठमोठ्या मूर्ती, देव्हारे, मंदिरे स्थाने आहेत व अखंड धूपाचा आरत्यांचा दरवळही आहे. पण खरी भक्ती नाही. आसक्ती यत्किंचितही सुटलेली नाही. मरणाच्या दारापर्यंत द्रव्य, धन, दारा, जमीन, प्रसिद्धी, इस्टेट याची लालसा इत्यादींनी त्यांचे हात बरबटलेले आहेत. या सर्वांच्या विवेकाने, चिकित्सेने शोध घेऊन सत्याचे ज्ञान घडवून घ्यावयास हवे. शिष्यत्व ही फार मोठी पदवी आहे. ती काही आम्हाला जमणार नाही. पण आमच्यामध्ये किमान सद्‌गुणांचा, सत्त्वगुणांच उदय व्हावयास नको का? राग, द्वेष, लोभ, अभिमान यांचा निचरा व्हावयास नको काय? या दृष्टीने प्रत्येकाने आत्मसंशोधन करावयास हवे! कर्मे शुद्ध व निस्वार्थ झाल्या शिवाय भक्तीत व परमार्थात पहिले पाऊलहि पडावयाचे नाही. देह हा सत्कर्मांनी शुद्ध होतो. मन हे आर्त भक्तीने, त्यागाने व सेवेने शुद्धी पावते. बुद्धी ही अखंड अनुसंधानाने परिमळते. एवढी बैठक तयार झाली नाही तर साधनमार्गात प्रवेश मिळत नाही. गुरुची दृष्टी वळत नाही. शिष्यत्वाची पदवी मिळत नाही. काहीहि साधत नाही.

● माझ्या सर्व क्षुद्र जीवनासह, वासनासह व हलक्या विचारणीसह '**मी साई भक्ती करतो,**' अशी कुणासहि बढाई मारता येणार नाही. माझा देह, मन व बुद्धी शुद्ध झाली तरच भक्तीच्या पहिल्या पायरीवर पाऊल ठेवावयाची माझी तयारी झाली, असे प्रत्येकाने समजावयास हवे. त्यानंतर ध्यान व योग यांच्या दुसऱ्या पायरीवर

जावयाचे असते. गीतेत कृष्णाने सांगितले आहे की ' **तू किमान फलाशारहित निष्काम सेवा कर्म कर** ' बाबांच्या भक्तमंदिराच्या आवारात शिरण्याची ही अगदी प्राथमिक कसोटी आहे. पुढील मार्ग हा फार मोठा पल्ला आहे. 卐

# इच्छापूर्ती

**—डॉ. इंदूताई नाईक**, लोणावळा

● मी दर महिन्यास श्री साईलीला मासिकाची वाट आतुरतेने पहात असते. मासिक आल्या आल्या मी काही कामात असले तरी मासिक चाळल्याशिवाय कधीही रहात नाही.

साईलीला कधीच ८–९ तारखेच्या आत येत नाही. पण या खेपेस ऑगस्टचे मासिक ता. ६ लाच हातात पडले. आश्चर्य व आनंद अनुभवीत मी मासिक पाकिटातून काढले व सवयीप्रमाणे चाळले आणि **श्री सिद्धारूढ स्वामी** ह्या पानावर असलेल्या नावावर व बाबांवर मन स्थिर झाले. आनंदाश्चर्याचा दुसरा अनुभव मी अनुभवीत होते. ८ तारखेनंतर येणारे मासिक ता. ६ ला म्हणजे श्री सिद्धारूढ स्वामींच्या पुण्यतिथीच्या दिवशीच मिळाले. ह्या आनंदाच्या पाठीमागे छोटीशी घटना आहे.

श्री सिद्धारूढ स्वामींच्या भक्तांकडे मला जाण्याचा प्रसंग आला. सर्व संत हे एकच. ह्या मतामुळे मी केव्हाही संताच्या दर्शनाला त्यांच्याबद्दल काही कार्यक्रम असल्यास जाण्याचा प्रयत्न करते. प्रथमच स्वामींचे दर्शन घडले. (अर्थात तसबीर) त्यांच्याबद्दल अनेक गोष्टी ऐकल्या. त्यांच्या शिकवणी कानावर आल्या. मन भारावून गेले. श्री स्वामींचा आपल्याकडे एकतरी फोटो असावा असे वाटले. परंतु शोधूनसुद्धा मला फोटो मिळाला नाही. ह्या गोष्टीला २ वर्षे होऊन गेली. हुबळीकडे जाणाऱ्या बऱ्याच भक्तांना सांगून पाहिले पण काही ना काही कारणाने मला फोटो मिळाला नाही शेवटीं साईबाबांना गाऱ्हाणे घातले. आणि आश्चर्य ! आज ६ ऑगस्ट रोजी त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीच माझे हातात श्रीस्वामींचा फोटो मिळाला. मला धन्यता वाटली व श्री साईबाबांच्या जागृतीची प्रचीती आली. कुणी ह्या घटनेला योगायोग म्हणतील परंतु साईमय झालेले माझे मन ह्याला बाबांची कृपाच समजणार. भक्तांच्या हाकेला धावणारे माझे बाबा ! माझे बाबा ! माझे बाबा !

# आर्शिवाद सद्‌गुरु साईचा प्रवास होई सुखाचा

—श्री. रमेश कृष्णराव गिरडकर
नालसाहेब चौक, तेलीपूरा, वार्ड क्र. ४६,
रु. नं. १५/२१, नागपूर-१८, ४४० ०१८

'सारे जहांसे अच्छा' असा भारत देश, त्यात गौरवशाली श्री ज्ञानेश्वर माऊली ते नागपूरच्या ताजुद्दीन बाबा ह्यांच्या विविध चमत्कारानी जडलेली आमची माय मराठी महाराष्ट्र भूमी. चमत्कारापेक्षा 'भक्तांच्या कल्याणा संताच्या विभूती'ची जाण असलेली परंपरा या महाराष्ट्राने संपादन करुन पावन झाला आहे.

मी, तसा संत शिरोमणी श्री. गजानन महाराज, शेगाव परमहंस श्री. पुंडलीक महाराज, मुर्तीजापूर ह्यांचे चमत्कार अनुभवले. माझे सहकारी कर्मचारी साईभक्त श्री. जोशी हे नेहमी मला साईबाबा त्यांचे कार्य, चमत्काराबद्दल सांगत. सहाजीकच माझी ओढ व उत्सुकता साईबाबाबाबत अधिकाधिक शिगेस पोहचू लागली. मी, नागपूरच्या वर्धा रोड वरिल साईबाबा मंदीरात साईभक्त श्री. जोशी सोबत एकदा गेलो, मंदीरातील वातावरण पाहून मन प्रसन्न झाले, नंतर मात्र महिन्यातून कमीत कमी एकदा असा वर्षभर माझा क्रम सुरू झाला. अनुभव येऊ लागले. तस-तशी माझी बाबां बाबत श्रद्धा असीम, दृढ होऊ लागली. कारण साईबाबांनी मला अनेकदा विपत्तीतून पार पाडले.

— पैकी मी, एक बोलका, सत्य किस्सा प्रस्तुत करित आहे.

'मी, नुकताच फेब्रुवारी महिन्यात माझ्या पत्नीसह शिरडीस गेलो. त्यावेळी शिरडीस लेखक-कवी संमेलन होते. साईबाबांचे दर्शन घेऊन, शिरडीहून मुर्तीजापूरला परमहंस श्री पुंडलीक बाबांचे दर्शनास गेलो, परमहंस श्री. पुंडलीक बाबांचे दर्शन घेऊन नागपूरला परत येताना दुपारच्या महाराष्ट्र एक्सप्रेसचे निदान एक तास आधी सुमारे १२ ते १२-३० चे दरम्यान स्टेशनवर आलो. जशी गाडी येण्याची वेळ होऊ लागली. तशी स्टेशनवर गर्दीही मोठ्या प्रमाणावर झाली.

गर्दी पाहून, मी मनात गाडीत जागा मिळण्याबाबत साशंक झालो, इतक्यात समोर फळांचा हातगाडीवाला आला. त्या हातगाडीत श्रीसाईबाबांचे नयनमनोहर आर्शिवाद देणारे आल्हाददायी असे चित्र दिसले. मी, त्या चित्राला नमस्कार करुन,

बाबांनी आम्हाला गाडीत जागा मिळावी म्हणून नामस्मरण केले. एक–दोन मिनीटा तच एक म्हातारा कुली आमचे जवळ आला व मला म्हणाला, बाबू नागपूरला जायचे का ? त्याला होय म्हटले, मग या माझे मागे, मी तुम्हास जागा देतो, तुमचे सामान द्या लगेच त्याने दोन सुटकेस घेऊन तो चालू लागला. आम्ही उभयता त्याचे मागो-माग जाऊ लागलो. थोड्या वेळाने गाडी फलाटावर आली. त्या कुलीने आम्हास आरा-मात जागा मिळवून दिली, मी त्याला हमालीचे भाडे किती झाले असे विचारले' त्यावर तो मला हसून म्हणाला कशाचे भाडे. अहो बाबू हे माझे कर्तव्य होते, ते मी केले, आम्ही फार आग्रह धरूनही त्याने हमालीचे भाडे घेतले नाही.

मी, त्यांचे प्रत्यक्ष व साईबाबांचे मनात आभार मानले, साईबाबांच्या कृपेने आमचा प्रवास सुखकर झाला. साईबाबांना भक्तांची केवढी चिन्ता असते, ह्याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हा उभयतांना आला. प्रत्यक्ष साईबाबांनी त्या म्हाताऱ्या कुलीच्या रुपात आम्हास, आमच्या हाकेला 'ओ' देऊन मदत केली ह्याची आम्हा उभयतांना 'मी माझ्या भक्तांचा अंकीत, देतसे हाक हाकेला याप्रमाणे हमखास खात्री पटली.

साईबाबांच्या कृपा प्रसादाने माझ्या कुटुंबातील सर्वजण सुखी व समाधानी आहेत.

साईनाथ गुरु माझे आई
मजला ठाव द्यावा पायी.

★

## नित्य मी जिवंत जाणा हेची ।
## नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥

—श्री. द. बा. वारकर
१/३८ शिवनेरी,
दादर मेन रोड, दादर मुं. नं. १४

● गेल्या मे महिन्याच्या ११ तारखेस मला शिर्डीस जाण्यास दुसऱ्यांदा योग आला. तेथे गेल्यावर दोघा गृहस्थाबरोबर तोंड ओळख होऊन त्याचे रुपांतर मैत्रीत

होऊन आम्ही तिघे दुसऱ्या दिवशी 'साकोरी' येथे श्री गोदावरी मातेच्या दर्शनास गेलो.

साकोरी येथे गेल्यावर प्रथम श्री. म्हापसेकर यांच्या चहाच्या दुकानात थांबलो तेथे थोड्या बहुत गप्पा-गोष्टी झाल्या. त्यांच्या दुकानात बसलेल्या एका वृद्ध गृहस्थावर माझ्या मित्राचे लक्ष गेले. त्याचे कुतुहल जागृत होऊन त्याने त्या वृद्ध गृहस्थास तुम्ही श्री साईबाबांस पाहिले का असे विचारले. त्यांनी होकारार्थी मान हलवताच मी व मित्राने त्यास नमस्कार केला आज शिर्डीत बाबांस पाहिलेल्यापैकी ते गृहस्थ असल्याने आमची हृदये आनंदाने भरून आली. त्यांचे वय ९८ वर्षे असल्याने त्यांना बरोबर आमच्याशी बोलता येत नव्हते त्यांना आलेला श्री साईबाबांच्या सहवासातला अनुभव श्री. म्हापसेकरांनी आम्हाला त्यांच्यात शब्दात निवेदन केला—

साकोरीतले हे वाणी गृहस्थ सज्जन व प्रामाणीक होते. त्यांचे एक किराणा मालाचे दुकान त्यावेळी पुण्यात होते व त्यावर ते आपला उदरनिर्वाह करीत. पुढील घडलेली गोष्ट १९१७ सालची असावी त्यावेळी त्यांचे वय साधारणतः ३५ वर्षाचे असेल. त्यांच्या मनात श्री साईबाबांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याचे आले ते एक दिवस साकोरीतून शिरडीस गेले. शिरडीस द्वारकामाई मशीदीत संध्याकाळी पोहचले. मशीदीत बरीच माणसे बसलेली होती त्यातून वाट काढीत ते बाबांजवळ गेले. बाबांच्या चरणांना स्पर्श करून बाबांचा आशिर्वाद घेतला त्यावेळी बाबांचे लक्ष त्यांच्या गळ्यात अडकविलेल्या घड्याळ्याकडे गेले. जुन्या काळी माणसे गळ्यात घड्याळ घालीत असत. बाबांनी त्यांच्याकडे घड्याळ मागितले बाबांच्या मनात घड्यळ मागण्याचा हेतू त्यांची मस्करी करण्याचा असेल. त्यांनी घड्याळ देताच बाबांनी ते घड्याळ हाताने चारपाच वेळा गरागरा फिरविले व जमीनीवर आपटले. घड्याळ फुटले, हे वृद्ध गृहस्थ मनातून संतापले मी दर्शनास गेलो असताना बाबांनी असे का करावे हे त्यांना कळेना पण तेथे एवढ्या गर्दीत बोलणार काय ! करणार काय ! मुकाट्याने आल्या वाटेने साकोरीत परतले.

चार–पाच महिन्यांनी पुण्यातल्या स्वतःच्या दुकानात एका भर दुपारी एक मुलगा त्यांच्या दुकानात आला व त्यांच्या हातात एक पुडके दिले. पुडके घेवून त्यांनी ते उघडून पहातात तो बाबांनी घेतलेले घड्याळ जसेच्या तसेच होते कुठलाही बदल त्यात नव्हता कंपनी सुद्धा तीच होती.. त्यांना शिर्डीतल्या फुटलेल्या घड्याळाची त्या प्रसंगी आठवण झाली. त्यांनी त्या मुलाला थांबावयास सांगून त्याला काहीतरी बक्षीस देण्याचे मनात आणून ते आतल्या खोलीत गेले व थोडे पैसे घेऊन ते बाहेर आले

तो मुलगाच कुठे गायब झाला. त्याला त्यांनी तेथे पुष्कळ शोधले परंतु तो मुलगा काही सापडला नाही त्याबरोबर त्यांना श्री साईबाबांची सर्वव्यापी सर्वकाळी ईश्वरी अस्तीत्वाची साक्ष पटली. हा अनुभव ऐकताना आमची मने आनंदाश्रुनी न्हावून निघाली.

★

# बाबांचे निरंतर छत्र म्हणून

—सौ. शालिनी शां. दळवी
यशोधन ब्लॉक नं. ४ ठाकूर नगर,
संत रामदास रोड मुलूंड पूर्व मुं. नं. ८१

● आम्ही वर्षातून एकदातरी शिर्डी येथे जात असतो. अनेक संकट प्रसंगी श्रीसाईबाबा धावून येतात आणि संकट निवारण करतात व माझे दुःखापासून संरक्षण करतात असा माझा गेले कित्येक वर्षांचा अनुभव आहे.

मध्यंतरी माझ्या मिस्टरांना आगगाडीतून गावाला जाताना मोठा अपघात झाला होता. इतका की त्यांना रुग्णवाहिकेतून परभारे 'जसराज हॉस्पीटल' मुलुंड येथे दाखल करावे लागले. घरी आम्हाला काहीच कल्पना नव्हती कारण गावी ते दोन दिवस रहाणार होते. दुसऱ्याच दिवशी माझे दीर मला ह्यांना अपघात झाल्याचे घरी सांगावयास आले. पण आमच्या घराला कुलूप होते. कारण मला जोरात कावीळ झाल्यामुळे मी डॉक्टरांकडे औषधासाठी गेले होते. ते तसेच शेजाऱ्यांच्या सांगण्यावरून लगेच डॉक्टरकडे आले, व मला बाहेर बोलावून ह्यांना बराच मोठा अपघात झाला असून बऱ्याच ठिकाणी लागलेले आहे व ॲम्ब्युलन्स मधून हॉस्पीटल मध्ये दाखल करावयास आणले आहे तर तुम्ही माझ्या बरोबरच हॉस्पीटलमध्ये चला असे म्हणू लागले. मी तर काविळीने अगोदरच हैराण झाले होते व अंगात तर शक्ती नव्हतीच व त्यातच हे ऐकून तर माझे तोंडचे पाणी पळाले. काय करावे काहीच सुचेना नीट माहिती नसल्यामुळे नाना प्रकारच्या शंका कुशंका मनात येऊ लागल्या. बरोबर मला धीर देण्यास फक्त माझी १८।१९ वर्षांची मुलगी ती मला काय धीर

देणार ? आणि त्याचवेळी मी श्रीसाईबाबांचे नामस्मरण केले. डॉक्टरकडून पहिली घरी आले व साईबाबांच्या फोटो समोर उभी राहिले व साईबाबांना आर्तस्वरात हाक मारून सांगितले की हे साईनाथ, तुझाच काय तो मला आधार आहे. आणि उदीची पुडी बरोबर घेतली व मी व माझी मुलगी जवळ जवळ धावतच हॉस्पीटलमध्ये पोहोचली.

ह्यांची तब्बेत तर पाहाण्यासारखी नव्हतीच. कारण भयंकर मुका मार लागलेला होता. अंगाला खूपच ठणके लागलेले होते व कोठे फॅक्चर आहे ह्याची सुद्धा काहीच कल्पना नव्हती. आम्ही सर्वजण तर फारच घाबरलेले होतो. कारण डॉक्टरने १०/१२ तरी 'एक्सरे' काढावयास लागतील असे सांगितले. मी मनातल्या मनात श्रीसाई-बाबांची करूणा भाकली व कोठेच फ्रॅक्चर नसू दे म्हणून विनवणी केली, व बरोबर नेलेल्या उदीच्या पुडीतील उदी 'एक्सरे' काढावयाच्या अगोदरच ह्यांच्या सर्व अंगाला लावली आणि अतिशय आनंदाची व आश्चर्याची गोष्ट म्हणजे श्रीसाईंच्या कृपेने ह्यांना कोठेच फ्रॅक्चर नव्हते व सर्व एक्सरे रिपोर्ट चांगले आले. ह्यांना बरे होण्यास थोडासा कालावधी लागला पण मोठे संकट टळले होते.

श्रद्धा ही एक बलाढ्य शक्ती आहे. तिच्याद्वारे अशक्य गोष्ट शक्य होते. बाबांची प्रत्येक भक्ताने श्रद्धेने व निष्ठेने पूजा केली तर बाबा त्या भक्ताला कुठल्याही संकटातून वाचवल्याशिवाय रहाणार नाहीत ह्याचे प्रत्यंतर मला आले व अशा त्या श्री साईसमर्थास माझे कोटी कोटी प्रणाम.

# श्री साईसच्चरित्रातील निमित्त स्थळे व त्यातून होणारा बोध किंवा परिणाम

१) द्वारकामाई झाडताना एका लहान मुलाच्या हातून बाबांची आवडती विट खाली पडली व फुटली.

बोध–बाबांनी आपला देहांत जवळ आला हे सुचविले.

२) नाशिकच्या अग्निहोत्री मुळ्यांना बाबांनी त्यांच्या गुरुंच्या रूपात दर्शन दिले.

बोध–आपण कुठेही गेलो तरी आपल्या गुरूचे कायम स्मरण ठेवावे.

३) एकदा एक ब्रह्मलोभी मारवाडी बाबांकडे ब्रह्म मागण्यासाठी आला.

बोध–ब्रह्म मिळविण्यासाठी केवढा त्याग करावा लागतो याचे सुंदर विवेचन साईसच्चरित अध्याय १६ व १७ मध्ये बाबांनी केले आहे.

४) एका ज्योतिषाने अपयश येईल असे सांगितल्याने रघुनाथ तेंडुलकरांचा मुलगा वैद्यकीय परिक्षेस बसावयास तयार नव्हता, परंतु बाबांच्या सांगण्यावरून परिक्षेस बसला व चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाला.

बोध–ज्योतिष किंवा हस्तसामुद्रिक यांचेवर विश्वास न ठेवता आपल्या गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेवा असे बाबांनी सुचविले.

५) बाबांनी लक्ष्मीबाईला भूक लागली आहे म्हणून भाकरी आणावयास सांगितली व ती भाकरी आल्याबरोबर कुत्र्यासमोर ठेवली.

बोध–कुत्र्याचा व माझा आत्मा एकच आहे असे बाबांनी दाखविले.

६) काकासाहेब दिक्षितांची मोलकरीण ईशावास्याचे कोडे उकलील असे बाबांनी दासगणूना सांगितले.

बोध–ईशाने प्रत्येक प्राणीमात्राला आच्छादिले आहे असे बाबांनी दाखवून दिले.

७) द्वारकामाई सभामंडपाचे काम चालू असतांना बाबांनी दोन तीन वेळा खांब उपटून टाकले व शेवटी एका खड्डयात चांदीचा रुपया टाकून कामास मंजूरी दिली.

बोध–कोणतीही वास्तू उभारताना प्रथम त्या वास्तूच्या भूमीला दान द्यावे असे बाबांनी सुचविले.

—श्री. **माधव गजानन गोरे**
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग
कुर्ला (प.) मुं. ४०००७०

297

# श्रीसाईलीला

## लेखक-कवी वर्गणीदारांना महत्वाच्या सूचना

१) श्रीसाईलीलेकडे पाठवावयाचे सारे लेख, कविता, चित्रे इ. साहित्य संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०००१४ याच पत्यावर पाठवावे. वर्गणीदारांनी पण आपली वार्षिक वर्गणी रुपये दहा याच पत्यावर पाठवावी; किंवा स्वतः येऊन भरावी व रितसर पोचपावती घ्यावी व ती नोंदीसाठी म्हणून जपून ठेवावी ही विनंती.

२) लेखक-कवींनी लिखाण पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूने भरपूर समास सोडून सुवाच्च अक्षरात नवीन शुद्धलेखन पद्धतीचे नियमास अनुसरून लिहून पाठवावे. लिखाण कागदाच्या दोन्ही बाजूस लिहून किंवा इनलँड लेटर किंवा पोस्टकार्डावर लिहून अजिबात पाठवू नये. ते स्वीकृत केले जाणार नाही.

३) श्रीसाईलीलेकडे लेखन पाठविताना श्रीसाईबाबा हाच प्रमुख विषय असावा. अन्य संतवाङ्मय, चरित्रे, भक्तीभाव, आध्यात्म, श्रीसाईभक्त, श्रीसाई मंदिरे इ. विषयांवरही साहित्य श्रीसाईलीलेकडे पाठविले तरी चालेल.

४) लेखाची पोच लेखकास त्वरीत हवी असल्यास लेखासोबत १५ पैशाचे तिकीट किंवा कार्ड सोबत जोडावे म्हणजे पोच रितसर पाठविली जाईल. पाठविलेल्या साहित्याचा निर्णय सुमारे महिन्याभरात कळविला जाईल. नापसंत साहित्य परत पाठविले जाईल.

५) कवींनी निदान दोन वर्षेतरी कविता अजिबात पाठवू नयेत.

६) पोस्टाने पाठवावयाचे सर्व अंक दरमहा एक तारखेस दादर मुख्य कचेरीतून योग्य त्या नोंदी घेऊन रवाना केले जातातच. उशिरात उशिरा म्हणजे सुमारे ८ तारखेपर्यंत ते देशभरच्या वर्गणीदाराना मिळावेत. अंक न मिळाल्याची तक्रार नजिकच्या डाकघरी करावी व मगच आम्हास लिहावे. अंक शिल्लक असल्यास पुन्हा पाठविला जाईल परंतु अशी शक्यता कमीच असते.

● ● ●

# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तांसाठी सूचना

१) शिरडीस पोहोचल्यानंतर चौकशी कचेरीत खोलीबद्दल चौकशी करा व आपले नाव प्रथम तिथे नोंदवा.

२) खोलीत सामान ठेवून कुलूप लावल्याशिवाय कोठेही बाहेर जाऊ नका.

३) सार्वजनिक हॉटेलमध्ये जागा मिळाली तर तुमचे सामान चिजवस्तू सांभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मागावर असतात.

४) स्नानगृहातून बाहेर येताना पैशाचे पाकीट, दागिने, हातातील घड्याळ, कपडे, भांडी वगैरे बरोबर घेण्यास विसरू नका.

५) अंगावर दागिने असलेल्या आपल्या लहान मुलांना एकटे सोडू नका.

६) श्रींचे आरतीचेवेळी धक्काबुक्की होते. त्यावेळी आपल्या मुलांना संभाळा व आपल्या खिसा पाकिटावर लक्ष ठेवा.

७) श्रींचे ऑफीस शिवाय कोणत्याही इतर ठिकाणी अगर कोणाच्या हातावर पैसे देऊ नका. धर्म कृत्य फक्त संस्थेमार्फत करावे.

८) श्रींचे ऑफिसात धर्म कृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागून घ्या.

९) श्री साईबाबा संस्थानचा, इतर ठिकाणी श्री साईबाबांचे नावावर चाललेल्या संस्थांशी काहीही संबंध नाही.

१०) श्रींचा कोणी शिष्य नाही, अगर वारसदार गादीवर बसलेला नाही. अगर मध्यस्ती नाही. कोणी श्रींच्या पेहेरावासारखा पेहेराव केला म्हणून विश्वास ठेवून फसू नका.

११) मार्गदर्शकांचे सोंग करून काही अपरिचित माणसे, शिरडीची स्थळे दाखविण्यासाठी ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेऊ नका.

१२) श्रींचे नावावर काही माणसे जंतर मंतर, धागादोरा करणारे मांत्रिक तांत्रीक म्हणून फिरत असतात, त्यांचेपासून सावध रहा.

१३) श्रींचे नावावर चालू असलेल्या साखळी पत्रास अजिबात महत्व देऊ नका.

१४) श्रींचे बाबतीत आधारभूत माहिती, ऑफिसात विचारावी. इतरांवर विश्वास ठेऊ नका.

१५) आपली काही तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठी ठेवलेल्या नोंद पुस्तकात ती नोंदवा. आपले पूर्ण नाव व पत्ता नोंदविण्यास विसरू नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.

● ● ●

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| ३०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=००
(व्ही. पी. ची पद्धत नाही)

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१२ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

# श्री प्रभुसाईनाथा

प्रभु साईनाथा । प्रभु साईनाथा ॥
भक्तांचे तू दुःख हरिसी, कृपा दृष्टी होता ।
संसाराच्या हरतील व्यथा, दृढभावे तुजला भजता ॥
तूच एक दाता, तूच एक त्राता ।
तुझे गुण गाण्याकरिता, शब्द ना पुरेसा ॥ धृ० ॥

जगा लावण्या सुपंथा, मार्ग सोपा दाखविला ।
उद्धार करण्यासाठी जगाचा, देह तू झिजविला ॥
शिर्डी नगराचा तुम्ही, उद्धार केला ।
किती गुण गाऊ मी, उपमा ना तयाला ॥ १ ॥

मानवास देऊनि शिकवण, भक्ती दीप लाविला ।
मंदिरात पाऊल ठेवीता, प्रसन्नतेचा फुलबाग फुलला ॥
तुमच्या दर्शनासाठी मनी, मोठी आंस मजला ।
'लीला' तुमची गाण्यासाठी 'चंद्रकांत' भुकेला ॥ २ ॥

—श्री. चंद्रकांत श्री. गरगटे, ३९९, गुरुवार पेठ, सातारा–४१५००२

## मोक्ष कसा मिळवावा

एकदा स्वामी विवेकानंद यांनी गावोगाव फिरून धार्मिक विचारांचा फैलाव व जनतेत जागृति घडवून आणण्याची आपले एक सहकारी विरजानंद यास विनंती केली. त्यावेळी मोक्षासाठी ज्यांची धडपड चाललेली होती असे विरजानंद म्हणाले, 'मोक्षासाठी मला अजून काही साधना करावयाची आहे, तीं मला पूर्ण तरी करू द्या.'

हे उत्तर ऐकून स्वामी विवेकानंद गर्जून म्हणाले, 'मोक्ष अधिकाराशिवाय मिळविता येत नाही. मोक्षासाठी नर्कवासात जावे लागेल. मोक्षपदाची तळमळ लागली असेल तर दुसऱ्यांची सेवा करा. सेवा करता करता संकटांचा वर्षाव झाला तरी त्यांचे स्वागत करा. स्वार्थबुद्धीने वागून स्वर्ग किंवा मोक्ष मिळविण्यापेक्षा परमार्थासाठी सहन केलेल्या संकटानी तुमच्यासाठी मोक्षाचे द्वार खुले होणार आहे.

—**स्वामीजींचे चरित्र**

# शिरडीमें साईनाथ बडे संत हो गये

शिणभाग प्रवासाचा जातो सर्व विरुनी ।
रमणीय समाधी मंदीराच्या केवळ दर्शनानी ।।

डिमडिम हा तुझ्या किर्तीचा अखंड वाजे जगती ।
मेघ गरजती बरसती तुझेच नाम घेती ।।

साई तुझ्या अलभ्य चरणांचा होताची स्पर्श ।
इच्छा धरील्या मनी पूर्ण झालो मी आकर्ष ।।

नामस्मरण साई तुझे करीता अविरत अचल ।
धडगे बांधले जातात क्लीष्ट आपत्तींचे तात्काल ।।

बनता, बनता बनेल ही तुझी वाणी मधूर खास ।
डे विल कम....आणि पाऊल पुढे पडेल हमखास ।।

संसारात जरी बसतात अनेक चटके दाहक ।
तमा कोण करील त्याची साई नाहक ।।

होऊनी तुमचा दास मी चरणाशी आलो साई ।
गत जन्मीची पुण्याई असेल थोडी काही ।।
येईन आता पुन्हा जातो मी साई, कृपादृष्टी असू द्यावी ।।

—श्री. गुलाबराव देशमुख
पनवेल

# साई-अष्टक

साई माझी माता, साई माझा पिता ।
तोचि माझा त्राता, संसारात ॥ १ ॥

साई माझा गुरू, साई माझे तारू ।
उतरवील पैल पारू, साईनाम ॥ २ ॥

साई माझा देव, साई माझा भाव ।
तोचि माझा जीव, सर्व काही ॥ ३ ॥

गोड त्याचे नाम, गोड त्याचे रूप ।
होई पूर्ण काम, साई कृपे ॥ ४ ॥

साई माझी भक्ति, साई माझी शक्ती ।
साई माझी मुक्ति, झाली असे ॥ ५ ॥

साई माझ्या घरी, साई माझ्या दारी ।
साई माझ्या प्रपंची, राहातसे ॥ ६ ॥

साई माझी मति, साई माझी गति ।
देई मज सन्मति, साई नाम ॥ ७ ॥

साई कृपा दाता, अनाथाच्या नाथा ।
तव पदी माथा, नमवीत असे ॥ ८ ॥

—श्री. प्र. गो. कुलकर्णी
रेणुका, बसस्थानका जवळ, अमळनेर

# मेरी बिनती सुनो ओ बाबा

तुम हो कितने महान
बसे तुममें भगवान
मेरी बिनती सुनो ओ बाबा ॥
जो हुई मुझसे भुल
उसे माफ करदो बाबा
आज आयी हुँ तुम्हारे द्वार
ना मुझे धुतकारो बाबा ॥
यह जग करे मुझे बदनाम
क्या किया मैं अन्याय ॥ ओ बाबा मेरी...
आपके दरबार में न कोई छोटा
न कोई बडा सभी एक समान
फिर ये क्यों ऐसा अन्याय
ओ बाबा मेरी...
चाहे कितनी बिजली कडके
चाहे कितने बादल बरसे
फिर भी ना मैं रहूँगी यहाँ से
ओ बाबा मेरी...
मेरे घर आज है खुषी कितनी
जो मैंने न देखी थी जो मैंने न सोचा था कभी
मेरे घर में आज है खुषी उतनी
ऐसे लगता है जैसे बाबा ने दी हो सब खुषी
यह मैं कैसे बताऊँ
कैसे आपको समझाऊँ
कि मेरे पास शद्ब है कम
तो कैसे उतनी खुशियाँ लिखाऊँ ॥
ओ मेरे साई बाबा ॥ मेरी...

—कु. कल्पना वापीवाला
रामप्रसाद को. ऑप. हौसिंग सोसायटी
ब्लॉक क्रमांक १ (तळमजला)
चार बंगला, मु. पो. अंधेरी (प.)

# ॐ साई

काय वर्णावा साईभक्ता अनुभव
पुण्य कर्मांतरी भेटला साईदेव ॥ १ ॥

धाव घाली भक्तांचीया हाकेशी
उदी तिर्थे दिला अनुभव अनेकांशी ॥ २ ॥

श्रद्धा सबुरीने ह्या प्रेमळ जीवनी
वाहिले होते सर्वस्व साई चरणी ॥ ३ ॥

होते आजवरी अशांत मी मानसी
तृप्ती नव्हती केव्हाही मम जीवासी ॥ ४ ॥

अनुभव मज एक अद्‌भूत आला
मज वाटे वदावे या समयाला ॥ ५ ॥

पाऊल टाकीताक्षणी साई दरबारांत
अवलोकीत हास्य वदन ते प्रशांत ॥ ६ ॥

विरोनी गेले अशांत मन त्या क्षणात
तृप्त झाले जीवन उरे न काही मनात ॥ ७ ॥

नको उदी नको तीर्थ वा प्रसाद
घ्या अनुभव शांतीचा साईदरबारात ॥ ८ ॥

—डॉ. इंदू नाईक
सीताकुंज, मुंबई-पुणे रस्ता, लोनावळा

# मागणे

[ श्रीसाईलीलाचे कवी श्री. पोतनीस यांनी १३-७-८२ रोजी ६५ व्या वर्षात पदार्पण केले. ह्यानिमित्याने त्यांनी श्री बाबांकडे केलेले काव्यरुप मागणे. आम्ही श्री. पोतनीस यांना दिर्घायुष्य चिंतितो. ]

चौसष्ठावी वाट कांटेरी मी
तुडवोनी आलो साई
नको अंतरू अन्त पाहू
व्याकूळ जीव हा होयी

× × ×

मज पामराला साई
निष्ठूर का झालासी
तूजविण कोठे जाऊ
कोठे राहू सांग मजसी

× × ×

नाही ! नाही !! नाही !!! आता
'मागणे' हे अन्य काही
तुझ्या चरणांचा वास
नित्य मिळावा रे साई

× × ×

जैसा जलावीण मासा
राहू न शकतो कोठे
तैसेची तुजवीण साई
जीवन माझे रीते

× × ×

तूच माय बाप माझा
सखा तू जीवाचा
'पोतनीस' विनवी साई
क्षण लाभू दे भाग्याचा

× × ×

—श्री. डी. बी. पोतनीस
२६/७ एच. बी. पिंपरी पुणे

# काय मागावे ?

देवा साईनाथ, कृपा सागरा,
मी मागत असतो, तू देत असतोस,
माझे मागणे संपत नाही,
तुझे देणे संपत नाही,
मागत मागत थकलो,
आता काय मागावे,

ज्ञान, वैराग्य, सौख्य,
स्त्री, पुत्र, धन,
भक्ति, कर्म आणि ज्ञान,
दिलास, देतोस !
मी काय मागावे,

नको, नको, नको,
दे, दे, दे, दे,
श्रद्धा आणि सबुरी सोडून काय मागावे ?

—प्रा. गुंडेराव पटवारी
साहित्यरत्न 'शिक्षाविशारद'
एन. एफ. जे कॉलिज बिदर ५८५४०१

☆

**श्रीसाईलीला**
**दिवाळी अंक १ नोव्हेंबर १९८२ रोजी**
**दिमाखाने प्रसिद्ध होणार**
: मुखपृष्ठावर :
पृष्ठे १२८] **बाबांचे संग्राह्य चित्र** [किंमत २ रु.

# श्री स्वामी समर्थ गीतावली

[ कवि–श्री. विश्वनाथ वि. कुलकर्णी एम. ए. प्रकाशक – श्रीदत्तभक्त अरुण संगीत मंडळ, बी. ७२ कमल पुष्प कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी कृशनचंद्र मार्ग, वांद्रा ( पश्चिम ) मुंबई ५० किंमत ५ रुपये ]

श्रीस्वामी समर्थ अक्कलकोट महाराज यांच्या अवतार कार्यातील काही प्रसंगांचे काव्य रुप कथा कथन एकूण २७ पदातून या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहे. कवीने ही गीते प्राकृत सुलभ भाषेत लिहिली असून श्री. अरुण नवाथे यांनी ती चांगली स्वरबद्ध केली आहेत. ही सर्वचगीते प्रासादिक असून ती चांगलीच उठावदार अशी आहेत. काही गीते स्वामींचे चरित्र सांगणारी तर काही त्यांचा महिमात्मक अशी आहेत या गीत मजकूराला जाड टाईप वापरलेला असून कागद व छपाई पण उत्कृष्ट झाली आहे प्रत्येक पद्य पानावर स्वामींचे पूर्ण पानाचे चित्र दिलेले असल्याने पुस्तकाची सजावटही छान झाली आहे. श्रीस्वामींची गीतरुपी जीवन कथा असलेले हे पहिलेच पुस्तक असल्याने प्रत्येक स्वामीभक्ताने ते अवश्य संग्रही ठेवावे अशी आमची शिफारस आहे.

# उन्मेष

[ लेखक– डॉ. श्री. दि. परचुरे, प्रकाशक श्री. वामन विष्णु भट अभिनव प्रकाशन, ५३ गुरुनानक मार्केट, आंबेडकर रोड, दादर मुंबई १४ पाने १२४ किंमत ७ रु. ]

श्रीसाईलीला मासिकाच्या इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी १९५४ ते १९८० या कालखंडात लिहिलेल्या ११ कथांचा संग्रह या पुस्तकात करण्यात आलेला आहे. वसंत, संगम, चित्रमय जगत धनुर्धारी, नवयुग विवेक इ. नियत कालीकातून त्या प्रकाशित झाल्या होत्या. या संग्रहातील सर्वच कथा वाचनीय असून त्यातून काहींना काही तरी बोध वाचकाला मिळतो हे या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य होय. समाजात सत्प्रवृत्त, उदार, प्रामाणिक व परोपकारी माणसांचा भरणा असल्यामुळे कथा वाचनीय व चटकदार कशी होऊ शकते याचे जणू प्रात्यक्षिकच डॉ. परचुरे यांनी या कथा संग्रहातून दिलेले आहे असा निर्वाळा प्रस्तावनाकार प्रा. वि. ह. कुलकर्णी यांनी जाता जाता दीला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अनुदान या संग्रहाला मिळालेले आहे.

—साईनंद

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

(मागील अंकावरून क्रमशः)

| | |
|---|---|
| ७६) श्री साईबाबा मंदिर | – वीर सावरकर रोड, ३-३-५३७ कांचीगुडी मु. पो. हैद्राबाद |
| ७७) श्रीसाई निलयम | – नल्लागुंठा, राणीगंज स्टेशन जवळ मु. पो. सिकंदराबाद (आं. प्र.) |
| ७८) श्री साईबाबा मंदिरम् | – मु. पो. येल्लाम्मा हिल्स, ता. अंकापल्ली जि. विशाखापट्टणम् |
| ७९) श्री साईबाबा भवन | – गांधीग्राम कॉलनी, मु. पो. किल्तूर (आंध्रप्रदेश) |
| ८०) श्रीसाई मंदिर | – मु. पो. पेड्डापुरम (आंध्रप्रदेश) |
| ८१) श्री साईबाबा मंदिर | – मु. पो. रामचंद्रपुरम (आं. प्र.) |
| ८२) श्रीशिरडी सद्गुरु साईबाबा मंदिर [श्रीराम साईबाबा मंदिर] | – चंद्रमौली नगर, मु. पो. गुंटूर (आंध्र प्रदेश) |
| ८३) श्रीसाई मंदिर व श्रीसाई समाज | – ३ मेन रोड, सोमेश्वर पुरम उलसूर, मु. पो. बंगलोर—८ |
| ८४) श्री साईबाबा नगर | – बडनेरा रोड, अमरावती (महाराष्ट्र) |
| ८५) शिरडी साईबाबा कोइल | – १३ सलाई स्ट्रीट, वेपिरी, मद्रास ७ |
| ८६) शिरडी साईबाबा मंदिर | – गिंडी रेल्वे स्टेशन जवळ मद्रास-१ |
| ८७) शिरडी साईबाबा मंदिर | – मु. पो. सालूर (आंध्र प्रदेश) |
| ८८) श्री साईनाथ मंदिर | – अयोध्या आश्रम, मदिनापल्ली (आंध्र प्रदेश) |
| ८९) श्रीशिरडी साईबाबा मंदिर | – एम. एच. हायस्कूल जवळ, मु. पो. प्रोडोटूर (आंध्र प्रदेश) |
| ९०) श्रीसाई मंदिरम् | – मेरी स्लेटर कॉलेजजवळ, रिंगरोड, मु. पो. विजयवाडा (आं. प्रदेश) |
| ९१) श्री साईबाबा मंदिर | – सिंगरानी कॉलरीज, मु. पो. कोथागुडम (आर. एस.) भद्राचलम (आंध्र प्रदेश) |
| ९२) श्रीशिरडी साईबाबा मंदिर | – शिवालयम अप्रोच रोड, गांधीग्राम, हिंदुस्थान शिप बिल्डिंग यार्ड, मु. पो. विशाखापट्टणम-५ |

(क्रमशः चालू)

# शिरडी-वृत्त माहे जुलै १९८२



## गुरुपौर्णिमा उत्सव

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरता आलेल्या भक्तांची व श्री साईबाबांचे दर्शनाकरिता पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा भक्तांची फारच गर्दी झाली होती. हा उत्सव सोमवार दि. ५-७-८२ ते बुधवार ७-७-८२ पर्यंत तीन दिवस समाधी मंदिरात मोठ्या थाटात साजरा झाला. नामांकित कलाकार श्री. नारायण डी. देशपांडे, मुंबई, श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई, आप्पा सामंत, श्री. श्यामसुंदर भेडा, संगमनेर, वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या व ह. भ. प. गंगाधर बुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले,

**गुरुपौर्णिमा उत्सव**—पहिला दिवस : सोमवार दि. ५-७-८२ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाल्यावर सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरवात झाली. श्रींचे मंगलस्नान, अभिषेक पूजा, आरती वगैरे नित्याचे कार्यक्रमा व्यतिरीक्त दुपारी ४-३० ते सायंकाळी ६-३० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७-३० ते ९-०० व ९-३० ते ११-०० पर्यंत श्री. नारायण डी. देशपांडे मुंबई यांचे गायन झाले. ९-१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस**—मंगळवार दि. ६-७-८२ रोजी पहाटे मंदिर ५ वाजता उघडले. उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने साईभक्तांची अतिशय गर्दी होती. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची अध्यायवाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधी मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगल स्नान झाले. नित्याचे कार्यक्रमा व्यतिरीक्त दुपारी ४-३० ते ६-३० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७ वा. धुपारती झाल्यावर रात्रौ ९-१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक साईनाम घोषात वाद्यांच्या गजरात समाधी मंदिरातून निघाली. श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्डपथक, राहाता बॅण्डपथक, सनई चौघडा, शिंगवादन, डफ, ढोल, टाळ मृदुंग, भक्ताचे गायन भजन अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजिक आला.

त्या ठिकाणी संस्थान कर्मचाऱ्यानी व ग्रामस्थ लोकानी भारुड गारुड कार्यक्रम केले. त्यानंतर मिरवणूक मंदिरात रात्री १२-४५ वा. आली, व मिरवणूकीतील

लोक कलाकारांचे कार्यक्रमात सामील झाले. नामांकित कलाकार दैठणकर जयवंत कुलकर्णी वगैरे कलाकारानी कार्यक्रम रात्रभर केले. साईभक्तांकरिता दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस :-** बुधवार दि. ७-७-८२ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले, सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत गुरुस्थान ठिकाणी रुद्राभिषेक झाला. सकाळी ११ ते १२-०० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास डोंबिवली यांचे काला कीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली. व साई-भक्ताना तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्रौ ७-३० ते ८-४५ पर्यंत ज्ञानेश्वर प्रासादिक भजनी मंडळ लक्ष्मीवाडी व ८-४५ ते १०-०० पर्यंत पिंपळवाडी भजनी मंडळाचा गारुड भारुड कार्यक्रम झाला. त्यानंतर १० वाजता शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**हवा पाणी :-** शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन :-** १) ह. भ. प. श्री. छबू महाराज, मुल्हेर.
२) ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास डोंबिवली.
३) ह. भ. प. मुरलीधर बुवा आहेर, निफाड.

**प्रवचन :-** १) ह. भ. प. शुक्लेश्वर भिमाजी कदम, आळंदी.
२) ह. भ. प. भागवत भिमाजीपंत पालकर, गणोरी.
३) ह. भ. प. मुरलीधर रामराव देशमुख, शिर्डी.

**भजन, गायन, वादन, नकला, नृत्य वगैरे :-** १) श्री. तुकाराम माधवराव दैठणकर, पुणे. २) श्री. चंद्रकांत शामराव लोणकर, पुणे. ३) श्री. ज्ञानोबा जगन्नाथ नगरकर, पुणे. ४) श्री. राजेंद्र गंगाधर जाधव, पुणे. ५) श्री. गंगाराम जाधव, ६) श्री. आप्पा सामंत, दादर. ७) मनोहर हरीभाऊ लोणकर, पुणे. ८) श्री. सुनील शामराव लोणकर, पुणे. ९) श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई. १०) श्री. शिवाजी धुमाळ शिर्डी. ११) श्री. ललीतकुमार जोशी, शिर्डी. १२) श्री. नारायण देशपांडे, मुंबई १३) श्री. अनंतराव राणे, मुंबई. १४) श्री. अनंतराव लेले, मुंबई. १५) श्री. वरदराज भट, मुंबई. १६) श्री. अरुण कारेकर, मुंबई. १७) श्री. दामू अण्णा दळवी, श्रीरामपूर १८) शुभलक्ष्मी थत्ते, श्रीरामपूर. १९) अभया काटकर, श्रीरामपूर. २०) श्री. दीनानाथ रामचंद्र श्रीरामपूर. २१) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. २२) श्री. रावसाहेब देशमुख,

अमरावती. २३) श्री. विष्णू भगवंत शेणवीभोबे, गोवा. २४) सौ. रेखा भंडारी, नागपूर. २५) श्री. श्रीकृष्ण भिडे, लक्ष्मीवाडी. २६) श्री. विजय पवार, सावळविहीर. २७) श्री. प्रदीप जाधव, लोअर परळ. २८) श्री. विनोद गोगटे, मुंबई. २९) विमल शिर्के. जळगांव. ३०) मास्टर निआमी, पुणे. ३१) विठ्ठल सातारकर, पुणे. ३२) जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. ३३) श्री. गोविंद कुमार मुंबई. ३४) श्री. मनोहर कदम मुंबई. ३५) श्री. अरविंद म्हात्रे, मुंबई. ३६) श्री. शशी लेले, मुंबई. ३७) श्री. यशवंतराव गव्हाणकर, मुंबई. ३८) श्री. मोहनराव कळंबी, मुंबई. ३९) श्री. लीलाधर काटकर, मुंबई. ४०) श्री. छबन शिवराम बिडवे, संगमनेर. ४१) श्री. देवीदार वाघ-चौरे, पुणे. ४२) श्री. महेश जनार्दन कुळकर्णी, पुणे. ४३) श्री. हनुमंतराव, हैद्राबाद ४४) श्री. एस. आजच्या, हैद्राबाद. ४५) रघुनाथ सांडभोर, पुणे. ४६) रेखा सुलभा मंत्री, मुंबई. ४७) डॉ. रामाचारी, हैद्राबाद. ४८) आप्पासाहेब कागे कोळपेवाडी. ४९) श्री. दिगंबर उद्‌धव भातोडे, राहाता. ५०) श्री. प्रभाकर रामचंद्र आवचट, नगर. ५१) श्री. जोशी एस. डी. राहाता. ५२) श्री. जे. एस. योगी, पंजाब. ५३) सोलापूरकर बंधू पुणे. ५४) श्री. शैलेश भागवत, ठाणे. ५५) रश्मिन भागवत, ठाणे. ५६) राजाभाऊ पेठे, ठाणे. ५७) श्री. कारेकर, ठाणे. ५८) श्री. ज्ञानोबा तात्याबा वाडेकर, शिर्डी. ५९) श्री. राजाभाऊ देशपांडे, पुणे. ६०) श्री. सदाशिवराव जाधव, पुणे. ६१) श्री. साठे, दौंड. ६२) श्री. पुंडलीक दगडूजी वाघ, येवला. ६३) श्री. शाम पुंडलीक वाघ, चेक्ला. ६४) श्री. शेख नबाब उमरपटेल, अस्तगांव. ६५) श्री. सिद्धेश्वर गोपाला थत्रे, बार्शी. ६६) श्री. केशव बिडवे, संगमनेर. ६७) श्री. किसनराज कपूरचंद दुगा नगर. ६८) श्यामसुंदर भेडा संगमनेर. ६९) श्री. दौलतभाई मुंबई. ७०) श्री. मधूकर सोनवणे, बडोदा. ७१) सौ. सविता गिजरे, शिर्डी. ७२) सौ. शोभा सुलभा अंधेरी. ७३) श्री. सुर्यकांत थिटे, पुणे. ७४) श्री. शिवाजीराव धुमाळ, भुसावळ ७५) श्री. भागवत बाळूराव, कोपरगांव. ७६) श्री. शंकर विठ्ठल तांबे, रत्नागीरी. ७७) श्री. भागवत यशवंत कराडकर, रत्नागीरी. ७८) श्री. गोविंद केशव सोनवणे, शिरुर. ७९) रामराव गोविंद सोनवणे, शिरुर. ८०) भाऊसाहेब गोविंदराव, शिरुण. ८१) श्री. दिलीप बिडवे, नासीक. ८४) श्री. महादेव तुकाराम तुपे, पुणे. ८५) श्री. दिलीप बिडवे, नासीक. ८६) श्री. गंगाधर जाधव, पुणे. ८७) श्री. मनोहर लोणकर, पुणे. ८८) नटवर चुडामण विसपुते, अमळनेर. ८९) रविंद्र मधूकर सोनवणे, बडोदा. ९०) श्री. गोकूळ रादूरकर, पुणे. ९१) श्री. बी. टी. राऊत नगर. ९२) श्री. ललीत कुमार देवकृष्ण जोशी, शिर्डी. ९३) सुनिल लोणकर. ९४) श्री. अजित कुलकर्णी, पुणे. ९५) सहिदास रामचंद्र मराठे, शिर्डी. ९६) श्री. नाना रघुनाथ कोराटे. ९७) श्री. दत्तात्रय दामोदर रासने, पुणे. ९८) वसंत दामोदर रासने, पुणे. ९९) मयूर

बॅण्डपथक, पुणे. ११०) श्री. रघुनाथ माधवराव नागरे, शिर्डी. १०१) श्री. चतुर्भुज नागरे, शिर्डी. १०२) श्री. माणिक साळी, शिर्डी. १०३) बारावकर ब्रदर्स, शिरडी. १०४) श्री. शांताराम भिराणे, शिर्डी. १०५) श्री. शशीकांत एकनाथ दळवी, मुंबई. १०६) श्री. सुरेश राजाराम अंजर्लेकर. १०७) श्री. अथवा जगन्नाथ मोरे. १०८) श्री. विलास राजाराम महाडीक. १०९) श्री. अनिल कोंडकर. ११०) श्री. सुरेश गमरे. १११) श्री. मारुती गुणाजी मांडवकर. ११२) श्री. विलास परळकर. ११३) श्री. प्रदीप रासने, अहमदनगर. ११४) श्री. संदिप यशवंत चव्हाण, वसई. ११५) सतिश पांडूरंग कर्वे, मुं. ११६) श्री. ज्ञानेश्वर प्रासादीक भजनी मंडळ लक्ष्मीवाडी. ११७) पिंपळवाडी भजनीमंडळ, पिंपळवाडी. ११८) रघुवीर शांताराम भिराणे. ११९) श्री. बाळाजी गुरव, शिर्डी. १२०) श्री. हनुमान भजनी मंडळ, इंदौर. १२१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनीमंडळी, गुरुकुंज आश्रय. १२२) श्री. एरचाइ आंक्लेश्वर, मुं. १२३) कल्याण चौधरी. १२४) अशोकदास. १२५) पूर्वी चौधरी. १२६) श्री. एन, आर, गोडशे. विदीशा. १२७) सौ. विमल बी. पुरोहीत. शिर्डी. १२८) कु. मंजिरी भालचंद्र कर्वे, पुणे. १२९) हरीॐ भजनी मंडळ, नायगाव १३०) रविंद्रनाथ शुक्ल हैद्राबाद. १३१) श्री. मोहन सिंहजी. १३२) श्री. बी. बी. सावदे, श्रीरामपूर. १३३) श्री. विठ्ठल भजन मंडळ, अमरावती. १३४) सौ. सीता लक्ष्मी सुंदरेशन पुणे. १३५) भगवती साईसंस्थान कुर्ला.


# श्रीसाईलीला

## श्रीसाईबाबा पुण्यतिथी विशेषांक

हा अंक नेहमी प्रमाणे १ ऑक्टोबर १९८२ रोजी प्रसिद्ध होईल या अंकात श्रीसाईबाबांच्या बालभक्तांनी **बाबांना अर्पण केलेल्या साहित्याची खास पुरवणी दिली** जाईल.

: मुखपृष्ठावर :

**अंकांची पाने ६४ ]** **बाबांचे बहुरंगी चित्र** **[ किंमत १ रु.**